सोमवार, २२ नोव्हेंबर २०२१
◆ वर्ष १४ ◆ अंक १२५
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## अंतरंग

...तर सर्वस्वी राज्य सरकार जबाबदार असेल -दरेकर/२
पाली नगरपंचायत निवडणुकीत शिवसेनेचे 'एकला चलो रे'/५
पनवेलच्या यश वनवेरूची संतोष ट्रॉफीसाठी निवड/६

## विद्यापीठे, कॉलेज कर्मचाऱ्यांचा आज लाक्षणिक बंद



**मुंबई :** येथील विद्यापीठासह राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विविध प्रश्न उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालयाच्या स्तरावर प्रलंबित आहेत. पाठपुरावा करूनदेखील हे प्रश्न सुटत नसल्याने विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने सोमवारी (दि. २२) राज्यव्यापी एकदिवसीय लाक्षणिक बंद करण्यात येणार आहे. यामुळे मुंबई विद्यापीठासह राज्यातील सर्व विद्यापीठे व वरिष्ठ महाविद्यालयांचे कामकाज ठप्प होणार आहे. राज्यातील अकृषी विद्यापीठीय व संलग्नित महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांच्या महासंघाच्या कृती समितीने आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी १६ नोव्हेंबरपासून राज्यव्यापी आंदोलन सुरू केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून सोमवारी एक दिवसाचा राज्यव्यापी लाक्षणिक बंद करण्यात येत आहे.

# पनवेलमध्ये ओबीसी जागर

### जनजागरण रथयात्रेस उत्तम प्रतिसाद



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ओबीसी जागर अभियान अंतर्गत भाजप उत्तर रायगड व पनवेल शहर ओबीसी मोर्चातर्फे जनजागरण रथयात्रेचे आयोजन रविवारी (दि. २१) पनवेलमध्ये करण्यात आले होते. भाजप मध्यवर्ती कार्यालय येथे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत शहर अध्यक्ष जयंत पगडे यांच्या हस्ते या रथयात्रेस शुभारंभ झाला.

ओबीसींच्या राजकीय आरक्षणासंदर्भात इम्पिरिकल डेटा गोळा करण्यासाठी ठाकरे सरकार जाणीवपूर्वक टाळाटाळ करीत आहे. सरकारने केवळ तात्पुरता अध्यादेश काढून ओबीसी समाजाची दिशाभूल चालवली आहे. हे सरकार ओबीसी समाजाबाबत उदासीन आहे. याचे जिवंत उदाहरण म्हणजे राज्य मागास आयोगाची या सरकारने केलेली दुर्दशा. ओबीसी समाजाला गृहित धरले जात आहे. या वेळी जर ओबीसी समाज एकत्र आला नाही, तर ओबीसींचे राजकीय अस्तित्व संपून जाईल आणि सामाजिक अस्तित्वदेखील धोक्यात येईल. त्यामुळे ओबीसी समाजाने एकत्र यावे यासाठी हे अभियान राबवले जात आहे.

या वेळी ओबीसी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ, उत्तर रायगड अध्यक्ष राजेश गायकर, सरचिटणीस दशरथ म्हात्रे, जिल्हा महिला संयोजक सीता पाटील, पनवेल शहर अध्यक्ष रामनाथ पाटील, महिला संयोजक ॲड. वृषाली वाघमारे, महापालिका प्रभाग समिती अध्यक्ष सुशीला घरत, नगरसेवक अजय बहिरा, नगरसेविका राजश्री वावेकर, सरचिटणीस अभिलाषा ठाकूर, हेमांगी वाघमारे, सदस्य भारती घरत, विभूती तांडेल, शैला आंबेकर, जरीना शेख, खैरे यांच्यासह नगरसेवक-नगरसेविका, पदाधिकारी, कार्यकर्ते व ओबीसी समाज बांधव-भगिनी उपस्थित होते. रथयात्रा पनवेल परिसरात फिरून ओबीसींच्या हक्काचे राजकीय आरक्षण त्यांना मिळालेच पाहिजे यासाठी जागर करण्यात आला. (पान २ वर..)

# अमरावती हिंसाचारप्रकरणी एकतर्फी कारवाई होतेय

### देवेंद्र फडणवीसांचा राज्य सरकारवर आरोप



**अमरावती : प्रतिनिधी**

अमरावती हिंसाचारप्रकरणी राज्य सरकारकडून एकतर्फी कारवाई होत आहे. ज्यांचा याच्याशी संबंध नाही अशा हिंदुत्ववादी संघटनांना टार्गेट केले जात आहे, असा आरोप विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. ते रविवारी (दि. २१) अमरावती येथे पत्रकार परिषदेत बोलत होते.

अमरावतीला दौऱ्यावर गेलेले देवेंद्र फडणवीस यांनी सकाळी शहरात दाखल झाल्यावर दंगलग्रस्त भागाची पाहणी केली. या वेळी त्यांनी नागरिक आणि व्यापाऱ्यांशी चर्चा केली. रुग्णालयात जाऊन जखमींची विचारपूस केली, तसेच अमरावतीच्या विभागीय कार्यालयात जाऊन अधिकाऱ्यांशीदेखील संवाद साधला. यानंतर त्यांनी पत्रकार परिषद घेत हिंसाचार प्रकरणावर भाष्य केले.

फडणवीस म्हणाले, अमरावतीतील घटना अत्यंत दुर्दैवी आहे. १२ तारखेला जो मोर्चा निघाला तो चुकीच्या माहितीच्या आधारे जाणीवपूर्वक राज्यभरात कारस्थान करून राज्याच्या विविध भागांमध्ये निघालेल्या मोर्चांपैकी एक मोर्चा होता. त्रिपुरामध्ये ज्या घटनाच घडल्या नाहीत त्या घटनांचे सोशल मीडियावर फेक क्रिएटिव्ह तयार करून त्यातून त्रिपुरात अल्पसंख्याक समाजावर हल्ला झालाय, मशिदी तोडण्यात आल्या आहेत, अशा प्रकारे फेकन्यूज तयार करण्यात आली. या गोष्टीचा पर्दाफाशही झाला आहे. जी मशिद जळताना दाखवली आहे ते सीपीआयएमचे एक कार्यालय असून त्याला आग लागली होती. कुराण जाळताहेत असे दाखवण्यात आले तो दिल्लीच्या एका कॅम्पमध्ये आग लागली होती तिथला फोटो होता. काही रोहिंग्यांचे फोटो होते, तर काही पाकिस्तानच्या एका शहरातील फोटो होते. यावरून देशभरात जाणीवपूर्वक एक नरेटिव्ह तयार करण्यासाठी समाजाला भडकविण्यात आले. (पान २ वर..)

### ...तर आम्ही गप्प बसणार नाही!

*अमरावतीमध्ये १३ तारखेला जी घटना घडली ती १२ तारखेच्या घटनेची प्रतिक्रिया होती. १३ तारखेला झालेल्या हिंसेचे मी समर्थन करणार नाही, पण आता सरकार, अधिकारी आणि अमरावतीचे पालकमंत्री सगळे १३ तारखेची घटना पुढे आणण्याचे चित्र तयार करीत आहेत. ते चुकीचे आहे. १२ तारखेची घटना घडली नसती, तर दुसऱ्या दिवशीची घटना घडली नसती. तरीही आता सगळी कारवाई १३ तारखेच्या घटनेवर चालली आहे. कुठल्याही विशिष्ट धर्माला लक्ष करणे आम्हाला मान्य नाही, पण त्याच वेळी चुकीच्या घटनेकरिता लांगुलचालन होत असेल, तर आम्ही शांत बसणार नाही, असे देवेंद्र फडणवीस यांनी या वेळी स्पष्ट केले.*

# पेट्रोल-डिझेलऐवजी दारूवरील शुल्क घटवले

### भाजपची ठाकरे सरकारवर टीका

**मुंबई : प्रतिनिधी**



राज्यातील महाविकास आघाडी सरकारने विदेशी मद्यावरील उत्पादन शुल्कात ५० टक्के कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयावरून भाजप नेते आमदार आशिष शेलार यांनी आघाडी सरकारवर टीका केली आहे.

'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पेट्रोल आणि डिझेलचे भाव कमी केले, तेव्हा राज्याने आपले कर कमी करावेत, अशी मागणी आम्ही केली, पण ते ठाकरे सरकारला ऐकायलाच गेले नाही, मात्र आता विदेशी दारूच्या किमती ५० टक्के कमी करण्याचा निर्णय घेतला. पब, पार्टी आणि पेग.. गुड गोईंग!, असे आशिष शेलार यांनी ट्विट करून म्हटले आहे.

### 'गांजा ओढा आणि तहान लागली की मद्यप्राशन करा'

रयत क्रांती संघटनेचे अध्यक्ष व माजी मंत्री सदाभाऊ खोत यांनीही राज्य सरकारचा समाचार घेतला आहे. 'महाराष्ट्र सरकारने दारूवरची एक्साइज ड्युटी १५० टक्क्यांनी कमी केली. हर्बल गांजा ओढा आणि तहान लागली की मद्यप्राशन करा, असा महाविकास आघाडी सरकारचा अजब कारभार सुरू आहे. एक्साइज ड्युटी कमी करून आता सरकारने दारू पिण्यासाठी लोकांना प्रोत्साहित करण्याचे काम हातात घेतले आहे,' असा टोला खोत यांनी लगावला आहे.

## विनोद तावडे भाजप राष्ट्रीय सरचिटणीसपदी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भाजपच्या नव्या राष्ट्रीय समितीची घोषणा झाली असून यामध्ये महाराष्ट्रातून माजी शिक्षणमंत्री विनोद तावडे यांची सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

पक्षाचे राष्ट्रीय महासचिव अरुण सिंह यांनी परिपत्रक काढून या संदर्भात घोषणा केली. याद्वारे तावडेंकडे राष्ट्रीय पातळीवर मोठी जबाबदारी देण्यात आली आहे.



उलवे नोड : शीख धर्माचे संस्थापक गुरुनानक यांच्या जयंतीनिमित्त सेक्टर ५मधील गुरुद्वारामध्ये लंगरचे आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत दर्शन घेतले व उपक्रमास शुभेच्छा दिल्या. त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी गुरुद्वारा अध्यक्ष जगजितसिंग बुमरा, सोनू रैना, इप्पी बुमरा, सुखदेव सिंग, दलजीत सिंग, अमरिक सिंग, सिमरनजीत सिंग, आशिष सिंग, टायगर ग्रुप अध्यक्ष आशिष टंडन, भाजप युवा मोर्चा उलवे नोड अध्यक्ष निलेश खारकर, उपाध्यक्ष विशाल म्हात्रे, प्रणय कोळी उपस्थित होते.






## एसटी कर्मचाऱ्यांच्या आंदोलनावरून दरेकरांचा इशारा

# ...तर सर्वस्वी राज्य सरकार जबाबदार

**मुंबई : प्रतिनिधी**



राज्यभर सुरू असलेले एसटी कर्मचाऱ्यांचे आंदोलन दडपण्यासाठी सरकारने प्रयत्न सुरू केले आहेत. यवतमाळ, इगतपुरीसह इतर ठिकाणांहून चार बस मुंबईतील आंदोलनात सहभागी होण्यासाठी येत होत्या, मात्र या कर्मचाऱ्यांना डांबून ठेवले आहे. त्यामुळे शांततेत सुरू असलेल्या आंदोलनाला हिंसक वळक लागेल. याची जबाबदारी सर्वस्वी सरकारवर राहील, असा इशारा रविवारी (दि. २१) भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी दिला.

भाजप नेते प्रवीण दरेकर रविवारी आक्रमक झालेले दिसले. दरेकर म्हणाले की, सरकार एसटी कर्मचाऱ्यांचे आंदोलन दडपण्याचे काम करीत आहे. यवतमाळ व अन्य ठिकाणाहून चार बसेस मुंबईतील आंदोलनात सहभागी होण्यासाठी येत होत्या. मात्र, त्यांना इगतपुरी येथे अडवून ठेवले आहे. त्या कर्मचाऱ्यांचे मोबाइल हिसकावून घेतले आहेत. प्रशासनाने ४० कर्मचाऱ्यांना तेथेच डांबून ठेवले आहे. कर्मचारी शांततापूर्ण वातावरणात आंदोलन करत आहेत, परंतु जर सरकार आंदोलन दडपत असेल, तर त्या आंदोलनाला हिंसक वळण लागेल. जर आंदोलन हिंसक झाले, तर त्याची सर्वस्वी जबाबदारी सरकारची राहील, असा इशारा दरेकर यांनी दिला. तसेच सरकारच्या दडपशाहीचा निषेध केला.

मुंबईतील आझाद मैदानावर सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी मनमाड येथून २१ एसटी कर्मचारी निघाले होते, मात्र त्यांना मनमाड पोलिसांनी अडवून ताब्यात घेतल्याचे समजते. मनमाड येथून पंचवटी एक्स्प्रेसने हे आंदोलन मुंबईकडे निघाले होते. त्यांना मनमाड रेल्वेस्थानकाबाहेर पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये संतापाची लाट आहे. मागण्या मान्य करेपर्यंत कामावर रुजू होणार नाही, असा इशारा त्यांनी दिला आहे. संपाची कोंडी फुटत नसल्याने सर्वसामान्यांची प्रचंड फरपट सुरू आहे.

एसटी महामंडळाचे राज्य सरकारमध्ये विलीनीकरण व्हावे, या मागणीसाठी गेल्या तीन आठवड्यांपासून कर्मचाऱ्यांचा संप सुरू आहे. जवपास १० हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांनी कुटुंबीयांसह आझाद मैदानावर ठिय्या दिला आहे. त्यात एसटीच्या खाजगीकरणाची सुरू झालेली चर्चा. नाशिकमधल्या पेठ आगारातील कर्मचाऱ्याने कमी पगारामुळे केलेला आत्महत्या. या साऱ्या घटनांमुळे एसटीच्या कर्मचाऱ्यांचा संताप वाढला आहे. आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी राज्यभरातील अनेक कर्मचारी मुंबईला येत आहेत, मात्र त्यांना ठिकठिकाणी अडविण्यात येत आहे.

# हवामान खात्याच्या इशाऱ्याने समुद्रकिनारी तुरळक पर्यटक

**रेवदंडा : प्रतिनिधी**

गेले तीन दिवस ढगांच्या गडगडाटासह वादळी वारा, पावसाचे हवामान खात्याने निर्देश दिल्याने लॉकडाऊननंतर नुकताच तेजीत आलेला पर्यटन व्यवसाय पर्यटकांनी पाठ फिरविल्याने मंदित आला आहे. पर्यटकांचे हाऊसफुल्ल शनिवार, रविवार सुद्धा बदलत्या हवामानाने शटडाऊन राहिल्याचे चित्र होते, तर समुद्रकिनारी तुरळक पर्यटक दिसले.

अलिबाग तालुक्यातील आवास, सासवणे, अलिबाग, नागाव, रेवदंडा, तसेच मुरूड तालुक्यातील काशिद, नादगाव व मुरूड समुद्र किनारे लॉकडाऊन पूर्णतः शिथिल झाल्याने बहरू लागले होते. शनिवार व रविवार हाऊसफुल्लचे चित्र दिसत होते. अनेक दिवस स्वतःला घरात कोंडून ठेवलेल्या पर्यटकांनी अलिबाग व मुरूडच्या समुद्रकिनारी धाव घेतली. ऐन दिवाळीच्या काळात पर्यटकांचा महापूर येथील समुद्रकिनारी दिसून येत होता. त्यातच हवामान खात्याने वादळी पावसाच्या दिलेल्या सर्तकतेच्या इशाराने पर्यटकांनी सुद्धा समुद्र किनाऱ्याला सुटी दिली.

परिणामी नुकतेच पर्यटकांच्या गर्दीने बहरलेले समुद्र किनारे ओस पडलेले दिसले. अगदीच तुरळक पर्यटकांची हजेरी समुद्र किनारी दिसत होती. पर्यटकांच्या आगमनाने जोश्यात आलेले हॉटेल, लॉजिंग, रिक्षावाले, गादीवाले आदी व्यावसायिक सुध्दा गुमान बसून होते. अलिबाग व मुरूडकडे दर शनिवार व रविवार या सुटीच्या दिवशी दिसणारी वाहनांची रेलचेल मुख्यः रस्त्याला तुरळक असल्याचे जाणवले, त्यामुळे या वेळी शनिवार व रविवार मुख्यः रस्त्याच्या नाक्यावर पर्यटकांच्या लहानमोठ्या वाहनाने ट्रफिक जॅमचे चित्र दिसलेच नाही.

हवामान बदलाने अलिबाग व मुरूड तालुक्यातील समुद्रकिनारी पर्यटकांनी चक्क पाठ फिरविल्याचे चित्र दिसले, एकूणच कोरोना संसर्ग रोगाच्या पार्श्वभूमीवर नुकताच जोशात आलेला पर्यटन व्यवसाय कोलमडून गेला. नित्याचे हाऊसफुल्ल शनिवार व रविवार सुटीचे दिवशीच शटडाऊन डे असल्यासारखे वाटत होते.

## सातारा जिल्हा बँक निवडणूक

# राष्ट्रवादीच्या दोन गटांमध्ये हमरीतुमरी

**सातारा : प्रतिनिधी**

सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या मतदानादरम्यान तणावाची परिस्थिती निर्माण झाली. जावळी तालुक्यात राष्ट्रवादीचे आमदार व उमेदवार शशिकांत शिंदे आणि ज्ञानदेव रांजणे यांच्या कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक बाचाबाची झाली. कुडाळ येथे झालेल्या या वादामुळे तणाव निर्माण झाला. पोलिसांनी हस्तक्षेप करत वाद मिटवण्याचा प्रयत्न केला.

आमदार शशिकांत शिंदे आणि ज्ञानदेव रांजणे हे दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आहे. जावळी मतदारसंघातून शशिकांत शिंदे हे संचालक म्हणून निवडून गेले आहेत. राष्ट्रवादीच्या एका गटाने यंदा शिंदे यांच्या उमेदवारीला विरोध केला होता. ज्ञानदेव रांजणे यांनी माघार घ्यावी यासाठी राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांनी प्रयत्न केले होते, मात्र रांजणे यांनी माघार घेतली नाही. त्यानंतर मतदानाच्या दिवशी दोन गटांत हमरीतुमरी झाली.

# काँग्रेसच्या पदयात्रेत मानापमान नाट्य

**कल्याण : प्रतिनिधी**

महागाईच्या विरोधात काँग्रेसने संपूर्ण राज्यात जनजागरण पदयात्रा सुरू केली आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या नेतृत्वातील ही पदयात्रा रविवारी (दि. २१) कल्याणमध्ये काढण्यात आली होती, मात्र या यात्रेत मानापमान नाट्य रंगले. काँग्रेस सेवा दलाच्या कार्यकर्त्यांनी या पदयात्रेवर बहिष्कार टाकल्याने काँग्रेसमधील सुंदोपसुंदी उघड झाली आहे.

नाना पटोले यांच्या नेतृत्वात कल्याणमध्ये जनजागरण पदयात्रा आली होती, मात्र सेवा दलाने या पदयात्रेवर बहिष्कार टाकला आहे. रॅलीत प्रोटोकॉल पाळला जात नाही. केवल दादागिरी सुरू आहे, असा आरोप करत काँग्रेस सेवादल कार्यकर्त्यांनी काँग्रेस जिल्हा अध्यक्ष सचिन पोटे यांच्या विरोधात घोषणाबाजी केली.



## शिक्षक पात्रता परीक्षेला ८० टक्के विद्यार्थ्यांची हजेरी

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत सन २०२१ वर्षासाठी शिक्षक पात्रता परीक्षा रविवारी (दि. २१) घेण्यात आली. पनवेल येथील सात परिक्षा केंद्रांवर पार पडलेल्या या परीक्षेला ८० टक्के विद्यार्थ्यांनी हजेरी लावली.

जिल्ह्यातून शिक्षक पात्रता परीक्षेच्या पेपर क्रमांक एकसाठी तीन हजार ५४२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यापैकी दोन हजार ९०७ विद्यार्थी परीक्षेला बसले. ६३५ विद्यार्थी अनुपस्थित राहिले, म्हणजेच परीक्षा देणाऱ्यांचे प्रमाण ८२.०७ टक्के होते. तर पेपर क्रमांक दोनसाठी तीन हजार २०३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यापैकी दोन हजार २९६ विद्यार्थी प्रत्यक्ष परीक्षेला बसले. ५०७ विद्यार्थी अनुपस्थित राहिले. म्हणजेच ८४ टक्के विद्यार्थी प्रत्यक्ष परीक्षेला बसले. रायगड जिल्ह्यातील पनवेल येथील सात परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा घेण्यात आली, अशी माहिती जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी यांनी दिली.

# जिल्हाधिकारी कल्याणकर पुरस्काराने सन्मानित




**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांना नवभारत गव्हर्नन्स अवॉर्ड-२०२१ने शनिवारी (दि. २०) राजभवनात राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

जिल्हाधिकारी डॉ. कल्याणकर यांना त्यांनी प्रशासकीय सेवेत लोकाभिमुख व पारदर्शक पद्धतीने नवनवीन उपक्रम राबवून उत्तम सेवा बजावल्याने सन्मानित करण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी डॉ. कल्याणकर यांनी आपल्या आतापर्यंतच्या संपूर्ण प्रशासकीय सेवेत मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मुख्य कार्यकारी अधिकारी, महानगरपालिका आयुक्त, सहसचिव, कामगार आयुक्त आणि जिल्हाधिकारी अशा विविध पदांवर अत्यंत उल्लेखनीय प्रशासकीय कामगिरी केली आहे. आता रायगड जिल्ह्यासाठीही ते विविध उपक्रम राबविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. पुरस्काराबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

# खारघरमध्ये कोल्ह्याचे दर्शन



**खारघर : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईला विस्तीर्ण असा खाडीकिनारा लाभला आहे. या खाडीकिनारी असंख्य जीव आहेत. या खाडीलगत असलेल्या खारफुटीच्या जंगलात अगदी पूर्वीपासून कोल्हे राहत आहेत. दोन दिवसांपूर्वी खारघर से. १७ येथील खाडीकिनारी कोल्हा दिसताच एका छायाचित्रकाराने कोल्हाचे फोटो कॅमेऱ्यात कैद केले आहे. खारघरमधील खाडी किनाऱ्यावर कोल्हाचे दर्शन झाल्यामुळे नागरिक आश्चर्य व्यक्त करीत आहे.

खारघरमधील सेंट्रल पार्कलगत असलेल्या ओवेपेठ, रांजणपाडा, मुर्बी गाव आणि सेक्टर १७, १६मधील वास्तुविहार लगत असलेल्या खाडीकिनारा परिसर आहे. थंडीची चाहूल सुरू होताच खाडीकिनाऱ्यावर देशविदेशातील विविध प्रकारचे पक्षी खाद्याच्या शोधात येत आहे. खाडीलगत असलेल्या खारफुटीच्या जंगलात पक्ष्यांचा अभ्यास करण्यासाठी पक्षीतज्ज्ञ आणि तर पक्षीप्रेमी पक्ष्यांना पाहण्यासाठी खाडी किनाऱ्यावर भेट देत असतात. गेल्या दोन वर्षांत कधीही कोल्हा आढळून आला नाही, मात्र शनिवारी सकाळी ८ सुमारास पक्ष्यांचा फोटो काढण्यासाठी गेलेल्या ए. के. नूल या छायाचित्रकाराला खाडी किनारा कोल्हा दिसताच त्यांनी त्याचे फोटो कॅमेऱ्यात कैद केले. हा फोटो सोशल मीडियावर व्हायरल होताच अनेकांनी खारघरमध्ये कोल्हा असल्याचे समजल्याने आश्चर्य व्यक्त केले.

खाडीतील मासळी, किनाऱ्यावर येणारे पक्षी आदी खाद्य मिळविण्यासाठी कोल्हा परिसरातील कांदळवनात राहत असावा, असे मुर्बी येथील ग्रामस्थ दत्ता दळवी यांनी सांगितले.

# मंदिर कारवाईप्रकरणी आमदार रमेश पाटील यांची पोलिसांशी चर्चा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

मोहने येथील गावदेवी मंदिरावर केडीएमसीच्या वतीने तीन दिवसापूर्वी कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे स्थानिक भूमिपुत्रांमध्ये मोठा रोष निर्माण झाला असून संतप्त जमावाचा पालिका अधिकाऱ्यांसोबत वाद झाला. यामुळे शुक्रवारी कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष व भाजपचे विधान परिषदेचे आमदार रमेश पाटील यांनी मोहने येथील मंदिराच्या घटनास्थळाला भेट देऊन स्थानिक भूमिपुत्रांशी चर्चा केली. त्याचप्रमाणे त्यांनी शिष्टमंडळासोबत कल्याण परिमंडळ ३च्या पोलीस उपायुक्तांची भेट घेऊन स्थानिक भूमिपुत्रांवरील गुन्हे मागे घेण्याची व मंदिर उभारण्यासाठी सहकार्य करण्याची विनंती केली.



मोहने येथे जुने गावदेवीचे मंदिर होते. ते मंदिर जीर्ण झाले असल्यामुळे स्थानिक गावकऱ्यांच्या लोकवर्गणीतून मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचे काम सुरू आहे, परंतु कोणतीही नोटीस न देता महापालिकेच्या वतीने सदरच्या बांधकामावर कारवाई करण्यात आल्याने या ठिकाणी तणावाचे वातावरण निर्माण झाले. ही कारवाई हेतुपुरस्सर करण्यात आलेली असून या कारवाईमुळे नागरिकांच्या भावना दुखावल्या आहेत. या वेळी मनपा प्रशासनाने मंदिराच्या कामात सहकार्य करणे गरजेचे आहे अन्यथा स्थानिक प्रकल्पग्रस्त भूमिपुत्र आंदोलनाचा पवित्रा घेतील, असे आमदार रमेश पाटील यांनी सांगितले.

याचप्रमाणे पोलीस उपायुक्त यांच्याशी चर्चा केल्यानंतर त्यांनी सोमवारी महापालिकेच्या आयुक्तांशी बैठक आयोजित केली आहे. या बैठकीमध्ये या प्रश्नावर तोडगा निघेल अशी आशा असुन तोपर्यंत सर्व ग्रामस्थांनी शांत राहावे, असे आमदार रमेश पाटील यांनी आवाहन केले. या वेळी आमदार विश्वनाथ भोईर, माजी आमदार नरेंद्र पवार, देवानंद भोईर, सुभाष पाटील, अ‍ॅड. भावेश पाटील, सतीश देशेकर, अशोक मुरकुटे, सुभाष भाबडे तसेच कोळी महासंघाचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.




पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
सोमवार, दि. २२ नोव्हेंबर २०२१ रोजी होणारे

कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड
सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस
(वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. यूपीएचसी-२, कोळेश्वर शाळा, कोळीवाडा, पनवेल
- ३. यूपीएचसी-३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
- ४. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
- ५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.

- ७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
- ८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
- ९. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
- १०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- ११. टाटा अ‍ॅडव्हान्स सेंटर, खारघर
- १२. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
- १३. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
- १४. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
- १५. न्यू इंग्लिश स्कुल, कळंबोली
- १६. सेंट्रल रेल्वे, पनवेल

कोवॅक्सिन

- १. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- २. पनवेल जिमखाना, ५२ बंगला, पनवेल
- ३. नागरी आरोग्य केंद्र-५, खारघर

पनवेल ग्रामीण लसीकरण

- पडघे रा.जि.प. शाळा
- खिडूकपाडा रा.जि.प. शाळा
- खारघर गाव रा.जि.प. शाळा
- कोपरा समाजमंदिर
- काळुंद्रे रा.जि.प. शाळा
- घोट रा.जि.प. शाळा (म्हात्रे पाडा/गोंधळी पाडा/मढवी पाडा/वाघाची वाडी
- धामोळे पाडा रा.जि.प. शाळा
- खुटारी/एकटपाडा रा.जि.प. शाळा
- किरवली/आडीवली रा.जि.प. शाळा
- धरणा रा.जि.प. शाळा


पान १ वरून



## पनवेलमध्ये ओबीसी जागर

राज्यातील महाविकास आघाडी सरकारच्या निष्क्रिय कारभारामुळे आज राजकीय आरक्षण गेले. उद्या शिक्षण आणि नोकरीचे आरक्षणही काढतील. या पार्श्वभूमीवर समाजात या संदर्भात जागर झाला पाहिजे आणि जोपर्यंत ओबीसीचे राजकीय आरक्षण पूर्ववत होणार नाही तोपर्यंत ही लढाई सुरूच राहील, अशी भूमिका या जागर यात्रेची आहे.

## अमरावती हिंसाचारप्रकरणी एकतर्फी कारवाई होतेय

आमचे स्पष्ट मत आहे की, इतके मोठे मोर्चे राज्यांच्या विविध भागांत निघतात हे काही आता ठरवले आणि लगेच मोर्चे निघाले असा प्रकार नाही. हे नियोजन करून काढलेले मोर्चे आहेत. नांदेड, मालेगाव, अमरावती यांसह राज्यातील इतर भागांमध्ये एकाच वेळी हे मोर्चे निघाले. म्हणून पहिल्यांदा याची चौकशी झाली पाहिजे की फेकन्यूजच्या आधारावर या मोर्चांचे नियोजन कोणी केले? त्यांची यामागची भूमिका काय होती? महाराष्ट्रात अशांतता पसरली पाहिजे या मानसिकतेतून केलेला हा मोठा कट होता का? याचीही चौकशी झाली पाहिजे. त्यातलाच एक भाग म्हणून १२ नोव्हेंबरला एक मोर्चा अमरावतीमध्ये निघाला. याला परवानगी होती की नाही, असेल तर परवानगी कोणी दिली होती याची चौकशी केली पाहिजे, अशीही मागणी फडणवीस यांनी या वेळी केली.


## दुखवटा

### वसंत सुर्वे



**कर्जत :** भाजपचे कर्जत तालुका माजी अध्यक्ष वसंतराव सुर्वे (वय ८५) नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात मुले, मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. बालपणापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक राहिलेले सुर्वे यांनी विश्व हिंदू परिषदेचे प्रखंड प्रमुख म्हणूनही त्यांनी अनेक वर्षे काम पाहिले होते. राम शीला पूजनापासून आयोध्या राम मंदिर आंदोलनाशी ते जोडले गेले होते. कर्जत आणि अंबरनाथ तालुक्यात शैक्षणिक संस्था चालवत असलेल्या अभिनव ज्ञान मंदिर शिक्षण संस्था, कपालेश्वर देवस्थान ट्रस्ट, लक्ष्मीकांत वाचनालय, जनता सहकारी ग्राहक भांडार, अखंड हरिनाम सप्ताह अशा अनेक संस्थांवर जबाबदारी घेऊन विश्वस्त म्हणून सुर्वे यांनी काम पाहिले होते.

### यशोदा मसणे



**कर्जत :** तालुक्यातील पोटल पाली गावातील स्वातंत्र्यसैनिक काशिनाथ मसणे यांच्या पत्नी यशोदा काशिनाथ मसणे यांचे रविवारी (दि. २१) वृद्धापकाळाने निधन झाले. देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत पाली आणि पोटल गावातील तब्बल २८ तरुणांनी भाई कोतवाल, गोमाजी पाटील यांच्यासोबत काम केले होते. त्यामध्ये काशिनाथ मसणे यांचाही समावेश होता.

## निवडक

### ट्रेलर पुलावरून कोसळला; चालक ठार



**उरण :** जेएनपीटी-गव्हाण फाटा उड्डाणपुलावरून मार्गक्रमण करणारा कंटेनर ट्रेलर रेल्वे रुळावर कोसळला. या अपघातात ट्रेलरचालकाचा जागीच मृत्यू झाला. हा अपघात शनिवारी रात्री ९.३०च्या सुमारास घडला असून या अपघातामुळे जेएनपीटी बंदराकडे जाणारी मालवाहू रेल्वेसेवा नऊ तास ठप्प झाली होती. या अपघाताची माहिती मिळताच पोलीस, वाहतूक पोलीस यंत्रणा घटना स्थळी तत्काळ दाखल झाली, परंतु या परिसरातील अंधारामुळे रेल्वेरूळ मोकळा करण्यासाठी, तसेच तपास कार्यात अडथळा निर्माण झाला होता.

### सार्वजनिक वाचनालयाचे उद्घाटन

**पनवेल :** खांदा वसाहत सेक्टर ८ येथील मार्केटमध्ये माता इंदूआई भगत प्रतिष्ठानतर्फे खांदेश्वर ज्येष्ठ नागरिक संघ सार्वजनिक वाचनालय उद्घाटन करण्यात आले. आजच्या मोबाइल काळात कोणाकडे बोलण्याकरिता आणि वाचनाकरिता वेळ नसतो. पुनः नागरिकांचा कल बोलण्याकडे आणि वाचनाकडे वळावा त्याकरिता वाचनालय उघडण्यात आले, असे प्रतिष्ठानचे अध्यक्ष जयंत भगत यांनी सांगितले. उद्घाटनाच्या वेळी खांदेश्वर ज्येष्ठ नागरिक संघ अध्यक्ष जाधव, सचिव जगताप, खजिनदार वर्मा, सभासद धोंडे, मोहिते, मोरे, ठाकूर व अन्य उपस्थित होते.




### वातावरण बदलामुळे आजारांना निमंत्रण

**पनवेल :** गेले काही दिवस रायगडासह राज्यात पावसाची रिपरिप सुरू आहे. अरबी समुद्रात निर्माण कमी दाबाच्या क्षेत्रामुळे कोकण किनारपट्टीसह, पश्चिम महाराष्ट्रातही पाऊसाची संततधार आहे. त्यामुळे हिवाळ्याचा हंगाम सुरू होताना पाऊस पडत असल्याने वातावरणात बदल जाणवू लागला आहे. सकाळी ढगाळ वातावरण, दुपारी पाऊस आणि रात्री उकाडा जाणत असल्याने अशा वातावरणाचा मानवाच्या शरीरावर परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. वातावरणातील हा बदल अनेक आजारांना आमंत्रण देत असून डॉक्टरांनी नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.

# भाजप भटके विमुक्त सेलची बैठक

## आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप कोकण प्रदेश विभागीय भटके विमुक्त सेलची रविवारी (दि. २१) भाजप मध्यवर्ती कार्यालयात झाली. या बैठकीला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट दिली. या वेळी त्यांचे स्वागत करण्यात आली.

बैठकीमध्ये कमिटीच्या रचनेसंदर्भात चर्चा करण्यात आली असून बुथ आघाडीतील सदस्यांना मार्गदर्शन करण्यात आले. प्रदेश संयोजक गोविंद गुंजाळकर, कोकण संयोजक श्रीराम इदाते, उत्तर रायगड संयोजक बबन बारगजे, कोकण सहसंयोजक भास्कर यमगार, भटके विमुक्त आघाडी उपाध्यक्ष अशोक शेळके, सिंधुदुर्ग जिल्हा अध्यक्ष नवलराज काळे, धनगर समाज रायगड जिल्हाध्यक्ष आनंदराव कचरे, भटके विमुक्त महिला रायगड जिल्हा अध्यक्षा विद्या तामखडे, कळंबोली अध्यक्ष आबा घुईकडे, संजय सातपुते, रामचंद्र शेळके आदी उपस्थित होते.

# नवी मुंबईत बोगस कॉल सेंटर उद्ध्वस्त

### सात जणांना अटक; मुद्देमाल जप्त

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

अमेरिकन नागरिकांना फसवणारे बोगस ॲमेझॉन कॉल सेंटर नवी मुंबईतून उद्ध्वस्त करण्यात आले आहे. आरोपींकडून १० लॅपटॉप, दोन राऊटर, आठ मोबाइल फोन, चार हेडफोन जप्त करण्यात आले.

रबाळे पोलिसांना शिवशंकर हाईट, से. २० ऐरोली येथील इमारतीचे फ्लॅटमध्ये अवैधरीत्या कॉल सेंटर सुरू असून, त्याद्वारे अमेरिकन नागरिकांची फसवणूक केली जात आहे, अशी खात्रीशीर बातमी मिळाली होती. त्यानुसार रबाळे पोलिसांनी सायबर एक्सपर्टसह १८ नोव्हेंबर रोजी रात्री छापा टाकला. इमारतीमधील रूम नं. २९०१मध्ये एकूण सात व्यक्ती हे १० लॅपटॉपच्या वापर करून व्हीओआयपीच्या माध्यमातून अमेरिकन नागरिकांना त्यांचे ॲमेझॉन अकाउंट हॅक झाल्याचे सांगून त्यांना ॲंटिव्हायरस अथवा सेक्युरिटी सर्व्हिस घेण्यासाठी भाग पाडत असे. त्याकरिता गिफ्ट कार्डद्वारे पैसे स्वीकारून ती रक्कम ते प्राप्त करीत असल्याचे दिसून आले. त्यामुळे आरोपी मेहताब आयुब सय्यद (वय २७, रा. मालाड), हुनेद शब्बीद कोठारी (वय ३५, रा. ग्रॅन्ड रोड), सुरज मोहन सिंग (वय २५, रा. कांदिवली), धर्मेश राकेश सालीयन (वय ३२, रा. भाईंदर), नौशाद रजी अहमद शेखइ (वय २४, रा. मालाड), सौरभ सुरेश दुबे (वय २६, रा. मिरा-भाईंदर), आसिफ हमीद शेख (वय २३, रा. भाईंदर) या सर्वांना अटक करण्यात आली. आरोपींना २३ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

# कामोठे ११मधील समस्या मार्गी; नगरसेविका हेमलता गोवारी यांचा पाठपुरावा





**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे से. ११ मधील सेक्टर ५ व ९ या भागातील विविध नागरी समस्या सोडविण्यात आल्या आहेत. या कामी नगरसेविका हेमलता गोवारी व सामाजिक कार्यकर्ते रवी गोवारी यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता. त्यानिमित्त येथील नागरिकांनी गोवारी दाम्पत्याचे जाहीर आभार मानले आहेत.

कामोठे शहरातील अतिशय दुर्लक्षित असा भाग म्हणजेच प्रभाग ११ मधील सेक्टर ५ व ९ हा विभाग होय. या विभागात नेहमीच विविध समस्यांना येथील नागरिकांना तोंड द्यावे लागते. त्यातीलच एक ज्वलंत विषय म्हणजेच येथील वर्षानुवर्षे रस्त्यांवर साचणारे व वाहते मलनिस्सारणाचे पाणी. या समस्या नगरसेविका हेमलता गोवारी व सामाजिक कार्यकर्ते रवी गोवारी यांना नागरिकांनी निदर्शनास आणून दिल्या. त्यानुसार नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने समस्येचे गांभीर्य लक्षात घेत गोवारी दाम्पत्यांनी या समस्येचा प्रशासनाकडे पाठपुरावा केला. अवघ्या तीन ते चार दिवसांत या समस्या मार्गी लावल्या. त्याबद्दल त्यांचा समस्थ व्यापारी व स्थानिक नागरिकांनी त्यांचा सत्कार केला व मनापासून आभार मानले.

# अवकाळी पावसामुळे फळे, भाज्यांचे नुकसान

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

परतीच्या पावसाने कृषिमालाचे मोठे नुकसान केल्याने शेतकरी हवालदिल झाला असतानाच दोन दिवस अवकाळी पडलेल्या पावसाने हातात आलेल्या शेतमालाचेही नुकसान केले आहे. या पावसामुळे फळ आणि भाज्यांचे नुकसान होऊन त्यांची आवक पुढील महिनाभर कमीच राहणार असल्याचा अंदाज व्यापाऱ्यांनी वर्तवला आहे.



अवकाळी पावसाचा फटका हंगामी फळांना बसला असून त्यांचा बाजारातील हंगाम लांबणीवर जाण्याची दाट शक्यता आहे, तर भाज्यांचेही यात नुकसान झाले असून भाज्यांची आवकही कमीच राहण्याची चिन्हे आहेत. सध्या द्राक्षे आणि स्ट्रॉबेरीचा हंगाम सुरू होत होता. बाजारात द्राक्षांची आवक सुरू झाली आहे. दररोज द्राक्षांच्या दोन ते तीन गाड्या बाजारात येत आहेत. बाजारात द्राक्षांचा हंगाम मोठा असतो. द्राक्षांची मोठी उलाढाल होत असते. त्यामुळे खवय्यांप्रमाणे, बाजारात व्यापारीही द्राक्षांची वाट बघत असतात. मात्र हंगाम सुरू झाला असतानाच अवकाळी पावसाने हजेरी लावून शेतकऱ्यांच्या मेहनतीवर पाणी फेरले आहे. पाणी पडल्यामुळे हाताशी आलेली द्राक्षे भिजली आहेत. त्यामुळे ती लवकर खराब होणार आहेत. त्यावर बुरशीजन्य रोग येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. परिणामी, द्राक्षांची निर्यातही होऊ शकणार नाही. हीच परिस्थिती स्ट्रॉबेरीच्या बाबतीतही आहे.

हिवाळ्यात महाबळेश्वरमधून मोठ्या प्रमाणात स्ट्रॉबेरीची आवक मुंबई बाजारात होते, मात्र स्ट्रॉबेरीच्या पिकालाही या पावसाचा मारा सहन करावा लागला आहे. त्यामुळे द्राक्षासह स्ट्रॉबेरीची आवकही लांबण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याचाच परिणाम फळबाजारावर होणार असून व्यापारही थंडावण्याची चिन्हे आहेत. पावसामुळे या हंगामी फळांचे मोठे नुकसान झाल्यामुळे त्यांचा हंगाम उशिरानेच सुरू होणार असल्याची माहिती व्यापारी शिवाजीराव चव्हाण यांनी दिली आहे.

भाज्यांवर कीड लागण्याचा धोका भाज्यांनाही या परतीच्या पावसाचा मारा सहन करावा लागला आहे. त्यामुळे पिकांच्या उत्पन्नावर परिणाम होणार असून अवकाळी पावसामुळे पिकांवर कीड लागण्याचा धोका निर्माण झाला आहे. परिणामी, चांगले पीक कमी होणार असून डाग आणि पाणी लागलेला भाजीपाला बाजारात येण्याची दाट शक्यता आहे.

### हापूसचे पीक धोक्यात

या अवकाळी पावसामुळे रायगड आणि कोकणातील काही भागात पावसाचा शिडकावा झाला असल्याने हापूसचे पीक धोक्यात आले आहे. आता हापूसला मोहोर येऊन त्याला फूट पडायला सुरुवात झाली होती, तर काही ठिकाणी फूट पडून लहान लहान कैऱ्याही धरल्या होत्या. त्यावर पावसाचे पाणी पडले आहे. त्यामुळे आंब्याचेही नुकसान झाले आहे

आधीच भाज्यांचे दर नेहमीपेक्षा दुप्पट-तिप्पट झाले आहेत. डिसेंबरपर्यंत ही आवक सुधारून भाज्यांची आवक वाढण्याची शक्यता होती. मात्र त्यातच या पावसाच्या हजेरीमुळे शेतीचे नुकसान होऊन चांगल्या मालाची आवक लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे दरही वाढण्याचा अंदाज व्यापाऱ्यांनी वर्तवला आहे.

# नवी मुंबई स्वच्छ शहरांत अव्वल

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

स्वच्छ सर्वेक्षण २०२१मध्ये नवी मुंबई महापालिकेने देशातील सर्वोत्तम स्वच्छ शहराचा प्रथम क्रमांकाचा किताब अखेर प्राप्त केला. महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेत शहरातील नागरिकांना त्यात सहभागी करून घेतले. त्याचे फलित मिळाले असून नवी मुंबईला गौरवण्यात आले.

महानगरपालिकेने शहरात सौंदर्यीकरणाच्या नाविन्यपूर्ण संकल्पना राबविल्या. त्यात स्वच्छता आणि पर्यावरणरक्षण-संवर्धनाचे संदेश प्रसारित करणाऱ्या आकर्षक रंग चित्रांनी सजलेली भित्तीचित्रे, महत्त्वाच्या चौकातील लक्षवेधी शिल्पाकृती, विद्युत दीपांनी उजळलेले उड्डाणपूल, अंडरपास व विद्युत खांब, स्वच्छ तलाव काठांवर विलोभनीय चित्रे अशा विविध प्रकारे नवी मुंबई शहर लक्षवेधी स्वरूपात सजले. जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्सच्या कल्पक विद्यार्थी कलाकारांनी आगळ्यावेगळ्या कल्पना राबविल्या. येथील मूळ आगरी-कोळी संस्कृतीपासून अत्याधुनिक प्रगतीपर्यंतचे विविध कलाप्रकार ठिकठिकाणी दृश्य स्वरूपात साकारत शहराचे रूपच पालटले.

यावर्षी स्वच्छतेच्या अंगाने विशेष लक्षवेधी ठरलेली बाब म्हणजे शहरातील मोठ्या नाल्यांमध्ये कचरा टाकला जाऊन ते अस्वच्छ होऊ नये, याकरिता या नाल्यांच्या काठांवर बसविण्यात आलेल्या विशिष्ट प्रकारच्या उंच जाळ्या. तसेच नाल्यांमधून वाहून जाणारा कचरा एके ठिकाणी अडकून साफ करता यावा, याकरिता नाल्यांच्या प्रवाहात लावण्यात आलेल्या जाळ्या या दोन महत्त्वाच्या उपाययोजनांमुळे शहरातील नाले स्वच्छ राहिले. याचीही दखल राष्ट्रीय पातळीवर घेण्यात आली.

नवी मुंबई शहरातील नागरिकांकडून घरात निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे घरातच वर्गीकरण करून तो कचरा गाड्यांमध्येही वेगवेगळा दिला जात आहे. तसेच कचरा वाहतुकीसाठी अत्याधुनिक आरएफआयडी तंत्रप्रणाली राबविण्यात येत असल्याने कचरा संकलनाप्रमाणेच योग्य पद्धतीने कचरा वाहतुकीतही नवी मुंबई नेहमीच आघाडीवर राहिली आहे. कोरोना प्रभावित कालावधीतही शहर स्वच्छतेकडे जराही दुर्लक्ष होऊ न देता कोरोनाग्रस्त विलगीकरणात असलेल्या घरांतील कचरा करोना सुरक्षा नियमांचे पालन करीत संकलित करून त्याची विल्हेवाटही त्याच सुरक्षित पद्धतीने लावण्याकडे नवी मुंबई महापालिकेने विशेष लक्ष दिले होते.

### लोकसहभागाला यश

*स्वच्छ सर्वेक्षण २०२१मध्ये लोकसहभागावर भर देताना कोरोना सुरक्षा नियमांचे पालन करीत महापालिकेने विविध उपक्रम राबविले. यामध्ये महापालिका अधिकारी, कर्मचारी, सफाई कामगार यांच्याप्रमाणेच लोकप्रतिनिधी व नागरिकांचाही मोठ्या प्रमाणात सक्रिय सहभाग लाभला. त्यामुळे शहरात स्वच्छतेची चळवळ उभी राहिली.*



**स्वच्छ सर्वेक्षण अभियान २०२२ला सामोरे जाताना आपले राष्ट्रीय मानांकन उंचविण्यासाठी निश्चय केला आहे. पहिला क्रमांक हा आपला ध्यास प्रत्यक्षात आणण्याकरिता रस्ते दत्तक योजना, शून्य कचरा झोपडपट्टी, गावठाण व सेक्टर संकल्पना, तसेच पेट कॉर्नर, असे विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून सर्वांनी मिळून अधिक जोमाने काम करू या.**

**-अभिजित बांगर, आयुक्त, नवी मुंबई महापालिका**

शून्य कचरा स्लम मॉडेलची यशस्वीरित्या अंमलबजावणी शहरातील अनेक सोसायट्या, उद्योग, हॉटेले, उद्योग समूह यांनी आपल्या आवारातच केली. नवी मुंबई महानगरपालिकेच्या सर्व शाळा तसेच उद्यानांमध्येही खत प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. कोपरखैरणे येथील डम्पिंग ग्राऊंड शास्त्रोक्त रितीने बंद करून त्याठिकाणी फुलविण्यात आलेल्या निसर्गोद्यानात स्वच्छता पार्क ही अभिनव संकल्पना महापालिकेने राबविली. शिवाय शहरातील दैनंदिन साफसफाई विहीत वेळेत व योग्य रितीने केली जात आहे की नाही, याचे निरीक्षण व नियंत्रण करण्यासाठी राबविलेली स्मार्ट वॉच संकल्पना महापालिकेला फलदायी ठरली आहे. महापालिकेने शहरातील शौचालयांचे व्यवस्थापन व नियमित स्वच्छतेकडे बारकाईने लक्ष देताना शहरातील ४०६ सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांची माहिती गुगल मॅपवर उपलब्ध करून दिली आहे. शौचालयांमध्ये महिलांसाठी स्वतंत्र व्यवस्था असून २१ ई-टॉयलेटपैकी विशेष सुविधांसह स्वतंत्र शी-टॉयलेटही कार्यरत आहेत.

# ‘मएसो’ ज्ञानमंदिरात दीपोत्सवाचा उत्साह



**कळंबोली : प्रतिनिधी**

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या ज्ञानमंदिर कळंबोली विद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त व संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त दीपोत्सवासह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

संस्थेचे संस्थापक वामन प्रभाकर भावे, आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके व लक्ष्मण नरहरी इंदापूरकर यांनी १८६० साली राष्ट्रीय शिक्षण देण्याच्या उद्देशाने संस्थेची स्थापना केली. या वर्षी शाळा समिती अध्यक्ष देवदत्त भिशीकर व महामात्र गोविंद कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यापैकी दीपोत्सव हा एक कार्यक्रम होता.

पालक-शिक्षक संघांचे प्रतिनिधी या सोहळ्याला आवर्जून उपस्थित होते. या वेळी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृदांनी दीपनृत्य सादर केले. प्रमुख पाहुणे म्हणून तळोजातील श्रीकेम कंपनीचे टेक्निकल डायरेक्टर के. जी. श्रीधर हे होते.

‘तमसो मां ज्योतिर्गमय’ या संस्कृतीचे संवर्धन करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन केल्याचे मुख्याध्यापिका रोहिणी गायकवाड, संजना बाईत, प्रियंका फडके यांनी सांगितले.

# शिवणकाम प्रमाणपत्राचे वितरण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पेहचान प्रोजेक्ट इदेमित्सु ल्युब प्रा. लि. व येरळा प्रोजेक्ट्स सोसायटी, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील अतिरिक्त एमआयडीसीतील जांभिवली येथे टेलरिंग प्रशिक्षण देण्यात आले होते. या शिवणकाम प्रमाणपत्राचे वितरण सरपंच रिया कोंडीलकर यांच्या हस्ते करण्यात आले.

या उपक्रमाबाबत देवदास झेंडे यांनी टेलरिंग या व्यवसायातून महिलांनी आपल्या जीवनमान सुधारण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. याकरिता पेहचान प्रोजेक्ट व इदेमित्सु व येरळा प्रोजेक्ट्स सोसायटी काम करीत आहे. जांभिवलीतील सर्व महिलांनी शिवणकामाचे चांगले शिक्षण घेतले आहे. त्याचा चांगला वापर करून घ्यावा, असे आवाहन झेंडे यांनी केले.

या वेळी ग्रामपंचायत सदस्य जान्हवी कोंडिलकर व प्रार्थना देशमुख व पूनम कोंडिलकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व उपस्थितांचे आभार ज्योस्ना देशमुख यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी देवदास झेंडे यांनी परिश्रम घेतले.



## संपादकीय

# शेतकरीहितैषी मोदी सरकार

सबका साथ सबका विकास यासोबतच केंद्रातील मोदी सरकारने सबका विश्वास कारभारचीही पुन्हा एकदा देशवासीयांना प्रचिती दिली आहे. शेतकऱ्यांच्या हितार्थ लागू करण्यात आलेले कृषी कायदे काही शेतकरी संघटनांना मान्य नसल्याने होणारा विरोध आणि हिंसा लक्षात घेता मोदी सरकारने हे कायदे रद्द करून मनाचा मोठेपणा दाखवून दिला आहे.

**भारत हा कृषिप्रधान देश असून आजही देशातील सुमारे ६० टक्के जनता शेती व शेतीपूरक व्यवसायांवर अवलंबून आहे. गेली अनेक वर्षे शेतकऱ्यांविषयीच्या सरकारी भूमिकेत बदल होत नसल्याने हा अन्नदाता आर्थिक संकटात सापडला आहे. एकीकडे नैसर्गिक आपत्ती, मजुरांची वानवा यामध्ये शेतकरी भरडला जात असताना दुसरीकडे सावकार, दलाल यांच्याकडूनही नाडला जात आहे. या दुष्टचक्रातून शेतकरी वर्गाला बाहेर काढण्याचे स्वप्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाहिले आणि ते सत्यात उतरविण्यासाठी सक्षम व प्रभावी पावलेही टाकली. देशातील कृषी क्षेत्रात क्रांतिकारी ठरणारे तीन कायदे मोदी सरकारने लागू केले. शेती उत्पादने व्यापार व वाणिज्य (प्रोत्साहन व सुविधा), शेतकरी (सशक्तीकरण व संरक्षण) किंमत आश्वासन व कृषिसेवा करार आणि जीवनावश्यक वस्तू दुरुस्ती कायदा असे हे तीन कायदे होते. यातील पहिल्या कायद्यामुळे कृषी उत्पन्न बाजाराबाहेर शेतीमाल विकण्याची मुभा आणि आंतरराज्य विक्रीसही परवानगी देण्यात आली होती. दुसऱ्या कायद्यान्वये कंत्राटी शेतीस मुभा, शेतीमाल प्रक्रिया उद्योगाशी करार करून शेतीमालाच्या आगाऊ किंमतनिश्चितीचा शेतकऱ्यांना अधिकार मिळणार होता, तर तिसऱ्या कायद्यात जीवनावश्यक वस्तू दुरुस्तीची तरतूद करण्यात आली होती. या अंतर्गत डाळी, कडधान्ये, तेलबिया, कांदा, बटाटे यांना अत्यावश्यक वस्तूंच्या यादीतून वगळण्यामुळे साठा करण्यावर निर्बंध राहणार नव्हते. यामुळे एकंदरीत शेतकऱ्यांची होणारी फसवणूक टळून त्यांच्या जीवनास स्थैर्य प्राप्त होण्यास मदत झाली असती, मात्र याचे श्रेय मोदी सरकारला जाईल या भीतीने अगदी सुरुवातीपासूनच काँग्रेससह इतर विरोधी पक्षांनी कृषी कायद्यांना विरोध दर्शविण्यास सुरुवात केली. वास्तविक या कायद्यांमध्ये नेमके काय नमूद आहे याचा किमान अभ्यास विरोधकांनी करणे अपेक्षित होते, पण विरोधाला विरोध म्हणून विरोधकांनी हे कायदे शेतकरीविरोधी असल्याची ओरड सुरू केली. याबद्दल दिशाभूल करून शेतकऱ्यांमध्ये अफवा पसरवल्या, तर काही संघटनांनीही राजधानी दिल्लीच्या सीमेवर आंदोलन केले. मोदी सरकारकडून वारंवार बैठका घेऊन, चर्चा करून शेतकरी प्रतिनिधींना समजाविण्याचा प्रयत्न केला, मात्र विरोधकांच्या बोलण्याला भुलून त्यांनी आपला विरोध कायम ठेवला. याच आंदोलनाला गेल्या महिन्यात उत्तर प्रदेशमध्ये हिंसक वळण लागून आठ जणांचा मृत्यू झाला. अखेर वाढता गोंधळ लक्षात घेऊन पंतप्रधान मोदींनी कृषी कायदे रद्द केले आहेत. याबाबत कायदेशीर प्रक्रिया येत्या हिवाळी अधिवेशनात पूर्ण केली जाणार आहे. या निर्णयावरून विरोधक मंडळी आपल्या अकलेचे तारे तोडत आहेत, जे निव्वळ मुर्खपणाचे लक्षण म्हटले पाहिले. खरेतर मोदी सरकार हे कायदे कायम ठेवू शकले असते, पण आपली तपस्या कमी पडली असे सांगत याचा दोष कुणालाही न देता पंतप्रधान मोदींनी सरकार शेतकऱ्यांसोबत असल्याचे स्पष्ट केले आहे. मोदी सरकारएवढा शेतकऱ्यांचा विचार आजवर कोणत्या सरकारने केलेला नाही. शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यात जमा केली जात असलेली रक्कम, त्यांना विविध सुविधा पुरविणे अशा पद्धतीने मोदी सरकार शेतकऱ्यांच्या हिताला नेहमीच प्राधान्य देत आहे. त्यामुळे विरोधकांनी फुकाच्या बाता मारणे बंद करावे.**

# गरज एकीकडे, निधी मात्र दुसरीकडे!

कर्जत तालुक्यात राज्य सरकार आणि स्थानिक आमदार यांच्याकडून राज्य सरकारच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी आणला जात आहे, मात्र कर्जत शहरातील विकासकामांना आणलेल्या निधीवरून राज्य सरकारमधील सत्ताधारी आघाडी मधील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये खटके उडाले आहेत. त्यात गरज नसताना निधी मंजूर केला जात असून ज्या ठिकाणी आवश्यकता आहे त्या ठिकाणी निधी आणण्यात लोकप्रतिनिधी यशस्वी ठरत नाहीत, अशा प्रतिक्रिया उमटत आहेत.

कर्जत तालुक्यातील उल्हास नदीवरील दहिवली येथील पूल धोकादायक बनला आहे. त्या पुलाची निर्मिती अ. र. अंतुले मुख्यमंत्री असताना झाली आहे. त्यात दहिवली मालेगाव पुलाचे चार खांब कोसळण्याच्या स्थितीत असल्याचे सातत्याने बोलले जात असून कमी उंचीच्या या पुलावरून दरवर्षी पावसाळ्यात पाणी वाहून जात असते. गतवर्षी या पुलावरून तब्बल सलग ३५ तास पाणी वाहून जात होते. त्यात दरवर्षी पुलावरून पाणी वाहत जात असल्याने पूल निकामी झाला असल्याचे स्थानिक सांगत असून २०१७ मध्ये या पुलाच्या बाजूला नवीन पूल उभारण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने अंदाजपत्रक बनवले होते. त्या वेळी १२ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकास राज्य सरकारने तांत्रिक मान्यता देखील दिली होती. त्याच वेळी याच नदीवर शेलू येथे नवीन पूल मंजूर झाला होता आणि त्या पुलाचे काम प्रगतीवर आहे. मात्र कुठे माशी शिंकली दहिवली-मालेगाव पुलाच्या कामाच्या निविदा अद्याप लाल फितीत आहेत. या पुलाची पाहणी दरवर्षी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि बांधकाम खात्याचे वरिष्ठ अधिकारी करतात, पण पुलाचे काम काही मार्गी लागत नाही.

तालुक्यात याच दहिवली पुलाच्या रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असते. कारण हा रस्ता पुढे मुरबाड राष्ट्रीय महामार्गाला जाऊन मिळतो, मात्र या रस्त्याची अवस्था ग्रामीण भागातील गावाला जोडणाऱ्या रस्त्यासारखी झाली असताना सुद्धा वाहनचालक यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या या रस्त्याच्या मजबुतीकरणाच्या कामाकडे राज्य सरकार लक्ष देत नाही, त्यामुळे स्थानिक सर्व राज्य सरकारवर नाराज आहेत. या रस्त्याच्या मागणीसाठी अनेक राजकीय पक्षांनी आणि स्वयंसेवी संघटनांनी आवाज उठवला आहे, मात्र स्थानिक लोकप्रतिनिधी आणि बांधकाम खात्याकडून कोणत्याही प्रकारचा रिलीफ मिळत नाही. या महत्वाच्या रस्त्याबरोबर तालुक्यातील वांगणी रेल्वेस्थानकपासून कळंबकडे जाणारा रस्ता देखील खड्ड्यात हरवला आहे. हा रस्तादेखील कर्जत-मुरबाड राष्ट्रीय महामार्गाला जोडणारा रस्ता आणि मुख्य म्हणजे कळंब भागातील ५०हून अधिक गावे आणि वाड्यांसाठी वांगणी रेल्वेस्थानकात जाण्यासाठी महत्त्वाचा आणि जवळचा रस्ता आहे, पण या रस्त्याकडे शासनाचे लक्ष नाही. हे दोन्ही रस्ते तालुक्याच्या जीवनवाहिन्या म्हणून महत्त्वाचे समजले आहेत.

अशा काही महत्त्वाच्या रस्त्यांना आणि पुलांच्या कामासाठी शासन निधी देत नाही, मात्र उल्हास नदीवरील चांदई येथे नवीन पुलाच्या कामासाठी चार कोटींचा निधी सार्वजनिक बांधकाम विभाग मंजूर करतो. चांदई येथेच १२ वर्षांपूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाने पूल बांधला होता. त्या पुलाची रुंदी कमी असल्याने त्या पुलावरून एकाच वाहन जाऊ शकते आणि याच अडचणीमुळे त्या ठिकाणी नवीन पूल मंजूर झाला आहे. त्यासाठी शासनाने चार कोटींचा निधी मंजूर केला आहे. याउलट त्याच ठिकाणी असलेला आणि १२ वर्षापूर्वी बांधण्यात आलेला पूल हा केवळ ५४ लाख रुपयात बांधण्यात आला होता.





त्याकडे लक्ष देता चार कोटी कुठे आणि ५४ लाख कुठे याचा अभ्यास शासनाने करण्याची गरज आहे. ज्या पुलांच्या निर्मितीची आवश्यकता आहे, तेथे पूल बांधले जात नाहीत आणि तत्काळ गरज नाही तेथे पूल बांधण्यासाठी मोठा निधी मंजूर होत आहे. चांदई पुलासाठी खरेच चार कोटींचा निधी लागणार आहे काय? याबाबत वेगवेगळ्या शंका उपस्थित होत असून हा निधी लाटण्याचा तर डाव नाही ना, अशा शंका उपस्थित होत आहे.

**खबरबात**
**संतोष पेरणे**

त्याचवेळी कर्जत शहरात राज्य सरकारच्या नगरविकास विभाग आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी कर्जत शहरातील रस्त्यांच्या कामासाठी निधी दिला आहे. त्यात कर्जत शहरातील दहिवली भागातील चार रस्त्यांच्या कामासाठी १७ कोटींचा निधी दिला असून या निधीमधून करण्यात येणाऱ्या रस्त्यांची कामे कर्जत नगर परिषदेने २०१९ मध्ये पूर्ण केली आहेत. त्यातील तीन रस्त्यांचे डांबरीकरण कर्जत नगर परिषदेने केले त्याच रस्त्यांवर एमएमआरडीएकडून करोडो रुपयांचा निधी खर्च केला जाणार आहे, त्यातील जुना वेणगाव रस्ता वगळता अन्य सर्व रस्त्याची आजची अवस्था सुस्थितीत अशीच आहे. त्या रस्त्यांवर वाहतूक देखील फार कमी असताना त्या रस्त्यांची कामे नव्याने तब्बल १२ कोटी रुपये खर्चून केली जाणार आहेत.

हे कशासाठी आणि कोणाच्या फायद्यासाठी असा प्रश्न राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने उपस्थित केला आहे. ज्या रस्त्यांची खऱ्या अर्थाने कर्जत शहराला गरज आहे, त्या कर्जत चारफाटा ते भिसेगाव या रस्त्याचे काम कर्जत नगर परिषद करताना दिसत नाही. ते काम गेली चार महिन्यापासून रखडले आहे, मात्र सुस्थितीत असलेल्या रस्त्यांवर डांबर उखडून सिमेंट काँक्रिटीकरण एमएमआरडीए आणि नगरविकास विभाग कोणाच्या फायद्यासाठी करू पाहत आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

नेरळ गावातून ममदापूर-भडवलकडे जाणाऱ्या रस्त्यासाठी एमएमआरडीएच्या माध्यमातून साडेतीन कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. नेरळ ममदापूर-भडवल रस्ता हा नेरळ रेल्वे स्टेशनसमोरून सुरू होतो आणि पुढे कल्याण-कर्जत रस्त्याला छेद देऊन ममदापूर गावाकडे आणि पुढे भडवलकडे जातो. या रस्त्यावर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण २०१८मध्ये नेरळ रेल्वे स्टेशन ते आयरे सर्व्हिस सेंटर या भागात आरसीसी सिमेंट काँक्रीटीकरण केले आहे. तर त्यापुढील रस्त्याचा भाग नेरळ विकास प्राधिकरणकडून २०२० मध्ये दिव्यादीप हॉटेलपर्यंतचा रस्ता काँक्रिटीकरण करून तयार झाला आहे. असे असताना आता नेरळ-ममदापूर-भांडवल रस्त्याच्या कामासाठी साडेतीन कोटींचा निधी मंजूर झाला आहे. ज्या रस्त्याच्या कामासाठी निधी मंजूर झाला आहे, त्या रस्त्याचा अर्धा भाग यापूर्वी आरसीसी काँक्रिटीकरण केलेला आहे. त्यामुळे हा मंजूर झालेला निधी एमएमआरडीएने कोणत्या अंदाजपत्रकाच्या आधारे केला आहे, हा प्रश्न निर्माण झाला असून निधी लाटण्यासाठी तर नाही ना? रस्त्याच्या कामासाठी निधी मंजूर केला. हा मुद्दा पुन्हा नव्याने चर्चेला येत आहे.

कर्जत तालुक्यात राज्य शासनाच्या माध्यमातून करोडो रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्या निधीमधून रस्त्यांची आणि पुलांची कामे केली जाणार आहेत, मात्र ती कामे खरेच जनतेच्या सोयीसाठी केली जाणार आहेत की निधी लाटण्यासाठी त्या कामांवर निधी मंजूर करण्यात स्थानिक लोकप्रतिनिधी जोर लावतात काय? याबाबत चर्चा सुरू झाली आहे. कर्जत तालुक्याचा विकास नजरेच्या टप्प्यात असल्याच्या त्यानिमित्ताने बोलले जात असून हा विकास अशाप्रकारे होणार असेल, तर खिसे कोणाचे भरणार याचा विचार शासनाने करण्याची गरज आहे.

# आंबा पिकाला राज्य शासनाची सापत्न वागणूक

**म्हसळा : प्रतिनिधी**

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत आंबा व काजू या फळपिकांसाठी राज्य शासनाने पुनर्रचित हवामान आधारित फळ विमा योजना लागू केली आहे. विमा उतरवण्यासाठी ३० नोव्हेंबरपर्यंत मुदत निश्चित केली आहे, परंतु आंबा पिकासाठी विमा हप्त्याची रक्कम ७० रुपये (प्रति आंबा कलम) वरून विमा कंपन्यांनी ती २९४ रुपये केली आहे. ती तत्काळ ७० रुपये करावी, अशी मागणी रायगड जिल्ह्यातील आंबा बागायतदार व महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाकडून राज्य शासनाकडे करण्यात आली आहे.



राज्यात आंबा पीक सर्वसाधारणपणे कोकणातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर व ठाणे जिल्ह्यांतून घेतले जाते. शासन प्रणालीत संपूर्ण कोकण विभाग एकच असताना व पीकसुद्धा एकच असताना पीक विमा हप्त्याची रक्कम प्रत्येक जिल्ह्याला स्वतंत्र का? असाही सवाल आंबा बागायतदारांना पडला आहे. मागील वर्षी आंबा पिकासाठी विमा हप्त्याची सक्कम रु. ७० (प्रति आंबा कलम) वरून विमा कंपन्यानी चौपट वाढवून आता रु. २९४ केली आहे. ती रद्द करून पूर्ववत करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघ अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी, तसेच रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन, म्हसळा तालुक्यातील शेतकऱ्यांनी केली आहे.

**कोकणातील पाच जिल्ह्यांना वेगवेगळे दर**

**हवामान आधारित फळपीक विमा योजना व कोकणातील विविध जिल्ह्यांतून आंबा पीक विम्यासाठी आकारण्यात येणारा दर**

- *रत्नागिरी कंपनी रिलायन्स रु. १३३ प्रति झाड (आंबा कलम)*
- *सिंधुदुर्ग कंपनी रिलायन्स रु. ७० प्रति झाड (आंबा कलम)*
- *रायगड भारतीय कृषी विमा कंपनी रु. २९४ प्रति झाड (आंबा कलम)*
- *पालघर कंपनी रिलायन्स रु. २०३ प्रति झाड (आंबा कलम)*
- *ठाणे HDFC ERGO रु. २१७ प्रति झाड (आंबा कलम)*



गेल्यावर्षी वाऱ्यापासून होणाऱ्या नुकसानीपोटी विमा संरक्षण देण्यात आले होते; मात्र यंदा तो निकष रद्द का केला? शासनाने भारतीय कृषी विमा कंपनी लिमिटेड या कंपनीची प्राधान्याने नियुक्ती केली आहे. तीच कंपनी अन्य विमा कंपन्यांपेक्षा जास्त दर का घेते व कोकणातील पाचही जिल्ह्यांतून हवामान सारखे असताना पिकविम्यासाठी वेगवेगळे दर का? या प्रश्नावर कोकणातील शेतकरी संघटीत होण्याच्या पवित्र्यात आहेत.

(छाया : संतोष पेरणे)



# बार्डी गावात ई-श्रमकार्ड नोंदणी शिबिर

## ■ २०० जणांनी केली नोंदणी

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील चिंचवली ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील बार्डी गावामधील अंगणवाडीत ई-श्रमकार्ड नोंदणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचा लाभ २०० ग्रामस्थांनी घेतला.

बार्डी गावातील निखिल कोळंबे, हेमंत कोंडीलकर, जगदीश मुने, संभाजी धुळे, दर्शन दळवी, तेजस कांबरी या तरुणांनी गावातील अंगणवाडीत ई-श्रमकार्ड नोंदणी शिबिराचे आयोजन केले होते. चिंचवली ग्रामपंचायत सदस्य दीपाली कांबरी, विश्वास नारायण लोभी, तसेच दर्शना पोपेटे, शरद कांबरी यांनी या शिबिराला भेट देऊन तरुणांच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

# नागाव हटाळे बाजारात मतदानाविषयी जागृती

**रेवदंडा : प्रतिनिधी**

प्रिझम सामाजिक विकास संस्थेने रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सहकार्याने अलिबाग तालुक्यातील नागाव येथील प्रसिद्ध हटाळा बाजार परिसरात पथनाट्य सादर करून मतदानाविषयी जनजागृती केली.


निर्वाचन आयोगामार्फत विशेष संक्षिप्त पुनर्रिक्षण कार्यक्रम २०२२ राबविण्यात येत असून भारतीय लोकशाही अधिकाधिक निकोप बनविण्यासाठी नागरिकांना मतदान कार्यातील सहभाग अधिक वृद्धिंगत होणे अपेक्षित आहे. याच उद्देशाने रायगड जिल्ह्यात विविध माध्यमांद्वारे जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. यानुसार, नागाव हटाळा बाजार परिसरात प्रिझम संस्थेच्या वतीने मतदान आपली जबाबदारी या शीर्षकांतर्गत पथनाट्यातून जनजागृती करण्यात आली.

या पथनाट्यात प्रिझम संस्थेचे प्रतिक कोळी, प्रसाद अमृते, अमृता शेडगे, प्रांजली पाटील, तुषार राउळ यांनी कलाकार म्हणून सहभाग नोंदविला. या कार्यक्रमास उपजिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे, नागावचे सरपंच निखिल मयेकर, ग्रामपंचायत सदस्या हर्षदा मयेकर, सदस्य राकेश मोरे, तलाठी उदय देशमुख, पोलीस पाटील संजय पाटील, सामाजिक कार्यकर्ते यज्ञेश पाटील यांच्यासह स्थानिक आणि बाजार ग्राहक उपस्थित होते.



(छाया : महेंद्र खैरे)

# चंद्रशेखर भडसावळे यांना पुरस्कार जाहीर



**कर्जत : बातमीदार**

कृषिरत्न तसेच कृषिभूषण पुरस्कार प्राप्त शेतकरी शेखर भडसावळे (नेरळ, ता. कर्जत) यांना वंदे मातरम संस्थेने वंदे मातरम किसान सन्मान पुरस्कार जाहीर केला आहे. राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्या हस्ते भडसावळे यांना हा सन्मान राजभवन येथे १ डिसेंबर रोजी होणाऱ्या कार्यक्रमात सन्मानपूर्वक दिला जाणार आहे.

चंद्रशेखर हरिभाऊ भडसावळे यांनी देशात कृषी पर्यटन संकल्पना प्रत्यक्षात आणली. महाराष्ट्र कृषी विभागाने १९९६ मध्ये कृषी भूषण पुरस्काराने त्यांना सन्मनित केले होते, तर २०१९ मध्ये कृषी विभागाने कृषी क्षेत्रातील सर्वात महत्त्वाच्या कृषिरत्न पुरस्काराने त्यांना सन्मानित केले आहे. वंदे मातरम या संस्थेचे शिवाजी फुलसुंदर, अनिरुद्ध हजारे, प्रसाद कुलकर्णी यांनी या वर्षीच्या वंदे मातरम किसान सन्मान पुरस्काराने गौरव करण्याचे निश्चित केले आहे. १ डिसेंबर रोजी मुंबई येथील राजभवन येथे हा सन्मान सोहळा होणार असून राज्याचे राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्या हस्ते त्यांना सन्मानित केले जाणार आहे.

# झाडावरून पडून आदिवासी तरुणाचा मृत्यू

**खालापूर : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये वसंत वाघमारे या युवकाचा शुक्रवारी (दि. १९) सायंकाळी चिंचेच्या झाडावरून खाली पडल्याने मृत्यू झाला. वसंत वाघमारे झाडावर चढून चिंचा काढीत असतात फांदी तुटल्याने २० फुटांवरून जमिनीवर कोसळला. याची माहिती मिळताच रसायनी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत वसंत वाघमारे याला दवाखान्यात नेले, मात्र तोपर्यंत त्याचा मृत्यू झाला.

# कर्जत नगर परिषद कचरामुक्त शहरांमध्ये कोकणात अव्वल

**कर्जत : बातमीदार**

स्वच्छ सर्वेक्षण २०२१मध्ये कोकणातील नगर परिषदांमध्ये रायगड जिल्ह्यातील कर्जत नगर परिषद अव्वल ठरली आहे. अमृत नॉन कचरामुक्त शहरात कर्जत नगर परिषदेला थ्री स्टार नामांकन मिळाले होते आणि त्याबद्दल कर्जत नगर परिषदेचा नवी दिल्ली येथील विज्ञान भवनात झालेल्या कार्यक्रमात सत्कार करण्यात आला.



नवी दिल्ली येथील विज्ञान भवन येथे केंद्रीय गृहनिर्माण तथा नगरविकास मंत्रालयाच्या वतीने स्वच्छ सर्वेक्षण-२०२१चा राष्ट्रीय पुरस्कार वितरण सोहळा झाला. या वेळी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, केंद्रीय गृहनिर्माण तथा नगरविकास मंत्री हरदिपसिंग पुरी, केंद्रीय गृहनिर्माण तथा नगरविकास राज्यमंत्री कौशल किशोर आदी उपस्थित होते. कोकणातील शहरी भागातून कर्जत नगर परिषद नॉन अमृत कचरामुक्त शहरांचे प्रमाणित थ्री स्टार मानांकन पुरस्कारात अव्वल ठरली. कर्जत नगर परिषदेच्या नागरध्यक्ष सुवर्णा केतन जोशी आणि पालिका मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी नवी दिल्लीत पालिकेला मिळालेला अमृत नॉन कचरामुक्त शहरांचा अव्वल क्रमांकाचा पुरस्कार स्वीकारला.

# पालीत शिवसेनेचे 'एकला चलो रे'

## विष्णू पाटील यांची पत्रकार परिषदेत घोषणा



**पाली : प्रतिनिधी**

राज्यात शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस पक्षाचे महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत आहे, मात्र आगामी पाली नगरपंचायत निवडणुकीत शिवसेना 'एकला चलो रे'च्या भूमिकेत आहे. शिवसेना पक्षसंघटना मजबूत असून पाली नगरपंचायतीची निवडणूक शिवसेना स्वबळावर लढविणार असल्याची घोषणा शिवसेना माजी जिल्हाप्रमुख विष्णू पाटील यांनी पालीत पत्रकार परिषदेत केली.

पाली नगरपंचायत निवडणुकीत शिवसेनेचे १७ पैकी १७ सक्षम उमेदवार निवडणूक लढवतील. हे उमेदवार जनतेने विश्वासाने निवडून द्यावेत. आम्हाला भरभरून आशीर्वाद द्यावा. पालीकर जनतेची स्वप्ने, त्यांच्या मनातील विकास व परिवर्तन आम्ही शिवसेनेच्या माध्यमातून घडवून दाखवू, अशी ग्वाही पाटील यांनी या वेळी दिली.

पाली नगरपंचायत प्रभाग रचनेची आरक्षण सोडत जाहीर झाली आहे. त्यानंतर आगामी नगरपंचायत निवडणुकांचे पालीत बिगूल वाजले. या निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षांनी जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे.

अष्टविनायकाचे प्रख्यात धार्मिक तीर्थक्षेत्र असलेल्या पालीचा पहिला नगराध्यक्ष विराजमान होण्यासाठी राजकीयदृष्ट्या अत्यंत प्रतिष्ठेचे मानले जात असून त्या दृष्टीने चुरस होणार आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना विष्णू पाटील पुढे म्हणाले की, विशेषतः पालीकर जनतेला शुद्ध व मुबलक पिण्याच्या पाण्याचा प्रश्न वर्षानुवर्षे सतावत आहे. नेहमीच पालीकर जनतेला प्रस्थापित राजकीय पक्षांच्या नेतेमंडळींकडून शुद्ध पाणीपुरवठा करण्याच्या वल्गना केल्या जाताहेत. पोकळ व फसव्या आश्वासनांनी जनतेची कायम दिशाभूल व फसवणूक केली असल्याचेही विष्णू पाटील म्हणाले.

पाली नगरपंचायत होऊ नये यासाठी शेतकरी कामगार पक्ष कारणीभूत ठरला आहे. पाली नगरपंचायत होण्यास विलंब झाल्याने विकास रखडला आहे. याला जबाबदार शेतकरी कामगार पक्ष असल्याचा आरोप या वेळी पाटील यांनी केला आहे.

या पत्रकार परिषदेला युवा नेते अनुपम कुलकर्णी, अविनाश शिंदे, संदेश सोनकर, भास्कर दुर्गे आदी उपस्थित होते. विष्णू पाटील यांनी आघाडीतील सर्वच सहकारी पक्षांवर टीका केल्याने आगामी काळात वाद वाढण्याची चिन्हे आहेत.

## भाजप जिल्हाध्यक्ष ॲड. महेश मोहिते यांचा वाढदिवस वृद्धाश्रमात साजरा

**धाटाव : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष ॲड. महेश मोहिते यांच्या वाढदिवसानिमित्ताने शनिवारी (दि. २०) भाजप युवा मोर्चा दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष अमित घाग यांच्या माध्यमातून अलिबाग परहुर पाडा येथील श्री संत गाडगेबाबा वृद्धधाम येथील वृद्धांना ब्लँकेट वाटप करण्यात आले.



या वेळी युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष अमित घाग, अलिबाग तालुका अध्यक्ष परशुराम म्हात्रे, कणे ग्रामपंचायतीचे सरपंच कुणाल पाटील, कुरडुस ग्रामपंचायत सरपंच अनंत पाटील, रोहा कामगार तालुका अध्यक्ष विलास डाके, युवा उद्योजक चक्रपाणी म्हात्रे, रोहा शहर अध्यक्ष निलेश धुमाळ, श्रीकांत दरडे, सागर डाके यांच्यासह भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.

## लसीकरणासाठी लकी ड्रॉची नामी शक्कल

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड नगर परिषद हद्दीतील कोविड लसीकरणाचे काम ८५ टक्के पूर्ण झाले आहे. शहरातील १८ वर्षावरील नागरिकांचे लसीकरण १०० टक्के पूर्ण व्हावे या उद्देशाने शहरात राहणाऱ्या नागरिकांना प्रोत्साहन देण्यासाठी दि. १८ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबरपर्यंत पहिला व दुसरा डोस घेणाऱ्या व्यक्तींचे लकी ड्रा काढण्यात येणार आहेत. यामध्ये २० भाग्यवंतांना कुकर, मिक्सर, घड्याळे, फॅन, इस्त्री, बॅग आणि म्युझिक सिस्टीम यासारख्या भेटवस्तू देण्यात येणार असल्याची माहिती नगराध्यक्षा स्नेहा पाटील यांनी दिली.

या अभियानांतर्गत मुरुड ग्रामीण रुग्णालयात लस घेतल्यानंतर संबधितांनी नगर परिषद कार्यालयात नाव नोंदणी करणे गरजेचे आहे. तसेच ६ डिसेंबरला नगर परिषद कार्यालयात लकी ड्रा काढण्यात येणार आहे.

भाग्यवान विजेत्याने लसीकरण प्रमाणपत्रासह वास्तव्याचा पुरावा सादर करणे गरजेचे आहे. तरी सदर अभियानात जास्तीत जास्त नागरिकांनी सहयोग द्यावा, असे आवाहन मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी केले आहे.

## खालापुरात बारवर छापा

### चार बारबालांसह व्यवस्थापकावर गुन्हा

**खोपोली : प्रतिनिधी**



कलोते गावाच्या हद्दीत सुरू असलेल्या पुनम ऑर्केस्ट्रा बारवर पोलीसांनी छापा टाकला. या वेळी अश्लील हावभाव करून संगीताच्या तालावर नृत्य करीत आरडाओरडा करणाऱ्या चार बारबालांसह बारच्या व्यवस्थापकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

हॉटेलसाठी दिलेल्या परवान्याच्या अटी व शर्तीचे उल्लंघन पूनम ऑर्केस्ट्रा बारमध्ये होत असल्याची तक्रार खालापूर पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार शनिवारी रात्री सव्वाअकराच्या सुमारास पोलिसांनी छापा टाकला. त्या वेळी सार्वजनिक शांततेचा आणि नियमांचा भंग करीत बार सुरू असल्याने कारवाई करण्यात आली. याबाबत खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक निरीक्षक युवराज सूर्यवंशी करीत आहेत.

## धुळीमुळे ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील चिंचवली शेनगाव ते मानकीवली रस्त्यावर धुळीचे प्रचंड प्रमाणात धुळीचे साम्राज्य असून, या रस्त्यावरून प्रवास करणारे वाहनचालक, तसेच परिसरातील ग्रामस्थांचे आरोग्य धुळीमुळे धोक्यात आले आहे.

नगरपालिका हद्दीतील काही भाग व पुढे जिल्हा परिषदेच्या तालुक्यातील हा रस्ता येथून जाणाऱ्या दगड खाणीच्या वाहनांमुळे धोकादायक झाला आहे. ओव्हरलोड वाहतुकीमुळे अनेकदा दुरुस्ती करण्यात आलेल्या या रस्त्याची फारच दयनीय अवस्था झाली आहे, रस्त्यात पडलेले मोठमोठे खड्डे अपघाताला आमंत्रण देत आहे खड्ड्यांमुळे पावसाळ्यात चिखल व आता धुळीचे साम्राज्य हा रस्त्यावर अनुभवास मिळत आहेत. त्याचप्रमाणे उडणाऱ्या धुळीमुळे परिसरातील ग्रामस्थांना खोकला व दम्याचा त्रास होत असल्याने, नागरिकांनी याबाबत संबंधित खात्याविरोधात संताप व्यक्त केला आहे. वयंघोषित नेते, पुढारी धृतराष्ट्राच्या भूमिकेत वावरत असल्याचीही चर्चा आहे.


| | | |
|---|---|---|
| रायगड जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,<br>अलिबाग-रायगड. जिल्हाधिकारी कार्यालय इमारत,<br>दुसरा मजला, हिराकोट तलावाजवळ, अलिबाग,<br>जिल्हा :- रायगड ४०२ २०१.<br>कार्यालय फो.नं. ०२१४१/२२४२२५ | सत्यमेव जयते | RAIGAD DISTRICT CONSUMER DISPUTES REDRESSAL FORUM, RAIGAD ALIBAG. COLLECTOR OFFICE BUILDING, 2nd FLOOR, NEAR HIRACOTE TALAV, ALIBAG, DIST-RAIGAD 402201<br>Office Tel. No. 02141/224225 |
| E-MAIL ID :- confo-rg-mh@nic.in | | Website :- www.confonet.nic.in |
| जा.क्र.जिग्रातनिआ/राय/२१/३६१७ | | दिनांक :- १७/११/२०२१ |

दरखास्तदाराचे वकील
श्री. वैभव बा. मयेकर

### जाहीर नोटीस

**अलिबाग येथील मे. रायगड जिल्हा ग्राहक तकार निवारण आयोगासमोर**

जिल्हाधिकारी कार्यालय इमारत, दुसरा मजला, हिराकोट तलावाजवळ, अलिबाग, जिल्हा-रायगड ४०२२०१

दरखास्त क्रमांक : ५९/२०२१ ते ८४/२०२१

श्री. सुजित म. गुरव (दरखास्त क्र. ५९/२०१८)
सौ. सुप्रिया न. चिंचकर (दरखास्त क्र. ६०/२०२१)
श्री. उमेश शं. कांबळे (दरखास्त क्र. ६१/२०२१)
श्री. संदिप तु. थोपटे (दरखास्त क्र. ६२/२०२१)
श्री. जिजाबा ध. कचरे (दरखास्त क्र. ६३/२०२१)
श्री. नितेश म. पुनकर (दरखास्त क्र. ६४/२०२१)
श्री. संजय आ. माळवदकर (दरखास्त क्र. ६५/२०२१)
श्री. मनोज य. देवरे (दरखास्त क्र. ६६/२०२१)
श्री. गजानन वा. लाहुडकर (दरखास्त क्र. ६७/२०२१)
श्री. ज्ञानदेव गे. उत्तेकर (दरखास्त क्र. ६८/२०२१)
श्री. रुपेश ग. भायदे (दरखास्त क्र. ६९/२०२१)
श्री. नितीन म. कायरकर (दरखास्त क्र. ७०/२०२१) दरखास्तदार
सौ. सविता अ. आव्हाड (दरखास्त क्र. ७१/२०२१)
श्री. राजेश पां. तायडे (दरखास्त क्र. ७२/२०२१)
श्री. किसन रा. धुमाळ (दरखास्त क्र. ७३/२०२१)
श्री. तुषार भा. गुंड (दरखास्त क्र. ७४/२०२१)
सौ. उर्मिला ज्ञा. मंडलिक (दरखास्त क्र. ७५/२०२१)
श्री. बबन ध. आटपाडकर (दरखास्त क्र. ७६/२०२१)
श्री. अमोल आ. धनावडे (दरखास्त क्र. ७७/२०२१)
श्री. नथुराम द. पाखुर्डे (दरखास्त क्र. ७८/२०२१)
श्री. रमेश धों. वाघचौरे (दरखास्त क्र. ७९/२०२१)
श्री. संजय म. गुरव (दरखास्त क्र. ८०/२०२१)
श्री. संजय पां. पालकर (दरखास्त क्र. ८१/२०२१)
श्री. सुशील स. पाटील (दरखास्त क्र. ८२/२०२१)
श्री. पांडुरंग शि. पाटील (दरखास्त क्र. ८३/२०२१)
श्री. विजय वि. गुरव (दरखास्त क्र. ८४/२०२१)

विरूद्ध

२) उषा चुण्णीलाल गुप्ता.
ऑफीस :- शॉप नं. २६, आदिशक्ती को. ऑप. हौसिंग.
सोसा. मर्या., सेक्टर १७, कर्नाळा बँकेमागे,
नवीन पनवेल, (पूर्व), पनवेल-रायगड ४१०२०६

### जाहीर प्रकटन

वर नमूद दरखास्तदार यांनी सामनेवाले यांच्या विरुद्ध ग्राहक संरक्षण कायदा २०१९ कलम ७१ अन्वये दरखास्त दाखल केलेली आहे. यातील विरुद्ध पक्ष यांना नोटीस पाठविली असता स्विकारत नाहीत/पत्ता बदलला/मिळून येत नाही. म्हणून या जाहीर समन्स/नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

विरुद्ध पक्ष यांनी वर नमूद पत्त्यावर दि. २८/१२/२०१२ रोजी सकाळी ११:०० वाजता वेळेत स्वतः अगर तर्फे प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुद्ध पक्ष हे हजर न राहिलेस ग्राहक तक्रार आयोगाचा एकतर्फा आदेश पारित करणेत येऊन पुढील आदेश करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मे. अध्यक्ष, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, रायगड-अलिबाग यांचे आदेशानुसार

**सही/-**
**प्रबंधक**
**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच करिता**
**रायगड अलिबाग**

**ठिकाण :- अलिबाग-रायगड**
**दि. १७/११/२०२१**

शिक्का



सिडको
शहरांचे शिल्पकार

### जाहीर सूचना

**(भूखंड वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजने अंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा/वाटपपत्र** करणे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दावे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ता.पनवेल, जि.रायगड | | | | |
| १ | तळोजा-९४८ | तळोजा १६०/के<br>पेंधर १३३/२<br>पेंधर २८६ बी | २६४/१<br>२६४/२<br>२६६/१<br>२९/०<br>३०/०<br>३४/१<br>६९/१<br>**एकूण** | १-४८-७<br>०-१८-२<br>०-१८-०<br>०-०१-०<br>०-०६-७<br>०-२६-०<br>०-१५-८<br>**२-३४-४** | २०५० चौ.मी. | **भूखंड क्र. ५, सेक्टर-२०, क्षेत्र २०५० चौ.मी.** | **श्री. शंकर हरिभाऊ पाटील** | निरंक |
| २ | कामोठे-२ २९२ | पनवेल ३६<br>पनवेल ३६ | ४९७/३ब<br>५१४/५क<br>५७१/३<br>६१०/२<br>५३३/३<br>**एकूण** | ०-३-०<br>०-१०-१<br>०-२-८<br>०-४६-५<br>०-५४-७<br>**१-१७-१** | १००० चौ.मी. पैकी शिल्लक २५० चौ.मी. | **मौजे कामोठे भूखंड क्र. १८४, सेक्टर २१, क्षेत्र २४९.९० चौ.मी.** | **मुळ कै. अंबो मऱ्या म्हात्रे (मयत) - यांचे वारस**<br>**१) कै. रामा उर्फ रामू मऱ्या म्हात्रे (मयत) - यांचे वारस**<br>१.१) राजू रामू म्हात्रे<br>१.२) कमला रामू म्हात्रे<br>१.३) मेघनाथ रामू म्हात्रे<br>१.४) मिनानाथ रामू म्हात्रे<br>१.५) वैशाली रामू म्हात्रे<br>२) प्रकाश जानू म्हात्रे<br>३) कृष्णाबाई राम पाटील<br>४) कुंदा जानू म्हात्रे<br>५) हौसा जानू म्हात्रे<br>६) वत्सला जानू म्हात्रे<br>**७) कै. जानकीबाई अंबो म्हात्रे (मयत) यांचे वारस**<br>८) भिमाबाई अंबो म्हात्रे<br>९) चिमाबाई अंबो म्हात्रे | |
| ३ | उलवे १२४३ | न्हावे २८३ | ब/२०<br>**एकूण** | ०-५६-०<br>**०-५६-०** | ५०० चौ.मी. | **भूखंड क्र.२०६, सेक्टर-१७, क्षेत्र ५०० चौ.मी.** | **१. कै. पांडुरंग धाया भोईर (मयत) यांचे वारस**<br>१) श्री. अशोक पांडुरंग भोईर<br>२) श्री. जयवंत पांडुरंग भोईर<br>३) श्री. हनुमान पांडुरंग भोईर<br>४) श्री. संतोष पांडुरंग भोईर<br>५) श्रीमती सुशिला हासुराम ठाकूर<br>**२. कै. मंजुळा रामचंद्र ठाकूर (मयत) यांचे वारस**<br>१) श्री. माधव रामचंद्र ठाकूर<br>२) श्री. रविंद्र रामचंद्र ठाकूर<br>३) पार्वती हेमंत माळी<br>४) योगिता योगेश पाटील | |
| ४ | उलवे ३२४ | तरघर १५२ | २१/१०<br>**एकूण** | ०-४१-०<br>**०-४१-०** | एकूण मंजूर पात्रता ३५० चौ.मी. पैकी १०० चौ.मी. प्रस्तावित | **भूखंड क्र. बी-२८, सेक्टर-१५, क्षेत्र १०० चौ.मी.** | **१. कै. चंदर उंदीर कोळी, कै ताराबाई नारायण कोळी व कै. शिनुबाई चंदर कोळी (मयत) यांचे वारस**<br>१) श्री. गजानन नारायण कोळी<br>२) श्री. शिवाजी नारायण कोळी<br>३) श्रीमती सुभद्रा नारायण कोळी<br>४) श्रीमती वनीता नारायण कोळी<br>**२. कै. दामु उंदीर कोळी व कै. गिरजाबाई शंकर कोळी (मयत) यांचे वारस**<br>१) श्रीमती मंजुळा महादेव कोळी | |
| ५ | काळुंद्रे (संचिका क्र. २७) | काळुंद्रे ६/७अ<br>**एकूण संपादित क्षेत्र** | ८/१ड<br>१६/३<br>२१/२ | ०-२१-०<br>०-१-८<br>०-११-८<br>**०-३४-६** | ३०० चौ.मी. पैकी १५० चौ.मी. | मौजे काळुंद्रे येथे सेक्टर-काळुंद्रे, भूखंड क्र. ०४, क्षेत्र १४९.३३ चौ.मी. | **मूळ भूधारक अनुसया धाऊ घरत** | निरंक |
| ६ | दापोली २३८ | ओवळे ७१ | ७७/६<br>**एकूण** | ०-४६-०<br>**०-४६-०** | एकूण मंजूर पात्रता ४०० चौ.मी. प्रस्तावित | भूखंड क्र. A-२७, सेक्टर १५, क्षेत्र ४०० चौ.मी. | **१. कै. लक्ष्मण गणपत म्हात्रे (मयत) यांचे वारस**<br>१. श्रीमती विनिता लक्ष्मण म्हात्रे<br>२. श्री. गणेशकुमार लक्ष्मण म्हात्रे<br>३. श्रीमती श्वेता रूपेश पाटील<br>**२. श्री. बाळाराम गणपत म्हात्रे**<br>**३. श्री. भरत गणपत म्हात्रे**<br>**४. श्री. तुकाराम गणपत म्हात्रे**<br>**५. श्री. ज्ञानेश्वर गणपत म्हात्रे**<br>**६. श्री. साईनाथ गणपत म्हात्रे**<br>**७. श्री. सत्यवान गणपत म्हात्रे**<br>**८. श्रीमती बेबी सत्यविजय पाटील**<br>**९. श्रीमती रसिका रविंद्र पाटील**<br>**१०. श्रीमती मैनाबाई गणपत म्हात्रे**<br>**११. श्रीमती भिमाबाई ऊर्फ सुमन गुरूनाथ घरत** | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/ हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पूरक कागदपत्रांची तपासणी करुन वाटपपत्र करुन देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र.१०, तळ मजला,**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

सिडको/जनसंपर्क/३१४/२०२१-२२

# आगामी आयपीएल भारतात होणार

## जय शाह यांची घोषणा



**चेन्नई : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) सचिव जय शाह यांनी इंडियन प्रीमियर लीग २०२२बाबत महत्त्वाची घोषणा केली आहे. आयपीएलचा १५वा हंगाम भारतात खेळवण्यात येईल, असे शाह यांनी सांगितले. चेन्नई सुपर किंग्जने चेन्नई येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

या कार्यक्रमाला भारताचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनी, दिग्गज क्रिकेटपटू कपिल देव, तमीळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन आदी उपस्थित होते.

या वेळी बीसीसीआय सचिव जय शाह म्हणाले, मला माहीत आहे की तुम्हाला चेपॉकमध्ये चेन्नई सुपर किंग्जचा खेळ पाहायचा आहे आणि ते लवकरच होणार आहे. आयपीएलचा १५वा हंगाम भारतात होणार असून दोन नवीन संघांची भर पडल्याने तो पूर्वीपेक्षा अधिक रोमांचक असेल.



गेल्या दोन वर्षांपासून आयपीएलचे आयोजन भारताऐवजी यूएईमध्ये केले जात आहे. गेल्या वर्षी कोरोना व्हायरसमुळे संपूर्ण स्पर्धा यूएईमध्ये आयोजित करण्यात आली होती, तर या वर्षी आयपीएलचा २०२१चा दुसरा टप्पा यूएईमध्ये खेळवण्यात आला. यंदा धोनीच्या नेतृत्वाखालील चेन्नई सुपर किंग्जने अंतिम सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सचा पराभव करून चौथे आयपीएल विजेतेपद पटकावले.

**पुढील वर्षी दोन नवीन संघांचा समावेश**


आयपीएलमधील एकूण संघांची संख्या आता आठवरून १० झाली आहे. बीसीसीआयने ज्या दोन नवीन संघांचा समावेश केला आहे त्यात लखनौ फ्रँचायझी आणि अहमदाबाद फ्रँचायझी यांचा समावेश आहे. संजीव गोएंका यांच्या मालकीच्या रायझिंग पुणे सुपरजायंट्स ग्रुपने लखनौ फ्रँचायझी ७०९० कोटी रुपयांची बोली लावून जिंकली, तर सीव्हीसी कॅपिटलने अहमदाबाद फ्रँचायझी मिळवण्यासाठी ५६२५ कोटी रुपयांची यशस्वी बोली लावली.


# पनवेलच्या यश वनवेरूची संतोष ट्रॉफी स्पर्धेसाठी निवड

**पनवेल : वार्ताहर**

फुटबॉलमध्ये महत्त्वाची असलेल्या संतोष ट्रॉफी स्पर्धेसाठी पनवेलमधील यश वनवेरू या युवा खेळाडूची महाराष्ट्र संघात निवड झाली आहे.

यश वनवेरू हा रायगडमधून अनेक वर्षांनंतर निवडलेला पहिला खेळाडू आहे. त्याच्याबरोबरच सिद्धार्थ कोलाको, मध्यभागी, अलझार दिल्लीवाला, बचावपटू, अद्वैत शिंदे, मिड फिल्डर (सर्व रा. नवी मुंबई) यांचीसुद्धा संतोष ट्रॉफी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. हे सर्व जण महाराष्ट्रासाठी खेळणार असून त्यांचा पहिला सामना येत्या ३ डिसेंबर रोजी राजस्थानबरोबर होणार आहे. पनवेलसह रायगड व नवी मुंबईकरांनी या खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.






# फिटनेससाठी डॉक्टरांचा पुढाकार


**■ क्रीडा स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद**

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग-मुरूडमधील डॉक्टरांनी डॉक्टर व त्यांच्या कुटुंबीयांसाठी अलिबागजवळील आरसीएफ वसाहतीमधील क्रीडा संकुलात क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. वैद्यकीय उपचाराबरोबरच शरीर फिट ठेवण्यासाठी वैयक्तिक व सांघिक खेळ महत्त्वाचे असल्याचा संदेश यातून देण्यात आला. या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

अलिबाग व मुरूड मेडिकल असोसिएशनच्या वतीने घेण्यात आलेल्या या क्रीडा स्पर्धेत क्रिकेट, बॅटमिंटन, कॅरम, टेबल टेनिस आदी खेळ खेळले गेले. या स्पर्धेत एकूण १५३ डॉक्टरांसह त्यांचे कुटुंबीय सहभागी झाले. स्पर्धेचा शुभारंभ शरीर सौष्ठव स्पर्धेत राष्ट्रीय पातळीवर प्रतिनिधित्व करणारे सचिन पाटील, प्रो-कबड्डीपटू केदार लाल, तसेच क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या रायगड पोलीस दलातील जिया चव्हाण यांच्या उपस्थितीत झाला. या वेळी डॉ. मयूर कल्याणी, डॉ. राजाराम हुलवान, डॉ. अशिष भगत, डॉ. गणेश गवळी, डॉ. महेंद्र दोषी, डॉ. अनघा भगत, डॉ. रवी म्हात्रे, डॉ. राजेंद्र मोकल, प्रमोद खानावकर आदींसह नागरिक उपस्थित होते.





## अरुणशेठ भगत यांच्या वाढदिवसानिमित्त कुस्ती स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या वाढदिवसानिमित्त तालुका कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने कुस्तीच्या खुल्या दंगली (स्पर्धा) आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा सोमवारी (दि. २२) दुपारी १.३० वाजता बेलवली-वारदोली येथील माऊली मैदानात होणार आहे. स्पर्धेचे आयोजक भाजप तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील आणि बेलवली अध्यक्ष सतीश पाटील आहेत.

# पुढील पाच वर्षे खेळण्याचे धोनीचे संकेत



**चेन्नई : वृत्तसंस्था**

भारताचा माजी क्रिकेटपटू आणि आयपीएलमधील चेन्नई सुपर किंग्जचा कर्णधार महेंद्रसिंह धोनीने चेपॉक स्टेडियमवर प्रेक्षकांच्या उपस्थितीत अंतिम सामना खेळण्याची इच्छा प्रकट केली आहे, परंतु ही अंतिम लढत पुढील वर्षी अथवा येणाऱ्या पाच वर्षांत कधीही खेळू, असे विधान करीत धोनीने निवृत्तीबाबतचा निर्णय गुलदस्त्यातच ठेवला आहे.

४० वर्षीय धोनीच्या नेतृत्वाखाली चेन्नईने यंदा चौथ्यांदा आयपीएल जिंकली. त्या वेळीसुद्धा धोनीने चेन्नईच्या प्रेक्षकांसमोर अखेरची लढत खेळण्याचा मानस व्यक्त केला होता. शनिवारी तमिळनाडूमधील एका कार्यक्रमात धोनीने पुन्हा या विषयावर भाष्य केले. या कार्यक्रमाला भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) सचिव जय शाह, माजी क्रिकेटपटू कपिल देव, तमीळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन आदी मान्यवर उपस्थित होते.

'चेन्नईच्या चाहत्यांनी नेहमीच आम्हाला भरभरून पाठिंबा दिला आहे. कारकीर्दीतील घरच्या मैदानावरील अखेरचा एकदिवसीय सामना मी रांची येथे खेळलो. त्यामुळे आता अखेरचा ट्वेन्टी-२० सामना चेन्नईच्या जर्सीत चेपॉकवर खेळायला आवडेल, परंतु तो सामना पुढील पाच वर्षांत कधीही येऊ शकतो,' असे धोनी या वेळी म्हणाला.







# पाकिस्तानचा हसन अली पुन्हा चर्चेत

**■ आयसीसीने सुनावली शिक्षा**

**ढाका : वृत्तसंस्था**

पाकिस्तान आणि बांगलादेश यांच्यातील टी-२० मालिकेत वेगवान गोलंदाज हसन अलीचे मोठे नुकसान झाले आहे. पहिल्या सामन्यात चमकदार कामगिरी करणाऱ्या अलीवर आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) आचारसंहितेचे उल्लंघन केल्याचा आरोप लावला आहे. ज्या अंतर्गत त्याच्यावर एक डिमेरिट पॉइंट लावण्यात आला आहे. त्याच्याशिवाय बांगलादेश संघालाही २० टक्के दंड ठोठावण्यात आला आहे.

हे प्रकरण पहिल्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्याशी संबंधित आहे. पाकिस्तानसाठी १७वे षटक खेळत असलेल्या हसन अलीने बांगलादेशचा यष्टिरक्षक फलंदाज नुरुल हसनची विकेट घेतली आणि विचित्रपणे त्याला पॅव्हेलियनमध्ये जाण्यास सांगितले, ज्याला आयसीसीने अनुशासनहीन मानले आहे. त्यामुळे तो आयसीसीच्या नियमानुसार स्तर-१साठी दोषी आढळला आणि त्याच्यावर एक डिमेरिट पॉइंट लावण्यात आला आहे. भविष्यातही असेच वर्तन राहिल्यास त्याच्यावर मोठी कारवाई होऊ शकते.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com